The Southern tree shrew *(Anathana ellioti)* also known as Madras tree shrew or Indian tree shrew is an endemic species to peninsular India. The species is present in eastern, central, southwestern and southern parts of peninsular India. This mammalian species is belonging to order Scandentia, and showing affinities with four other mammalian orders viz. Insectivora, Carnivora, Rodentia and Primates. It is omnivore species, feeds on seeds, fruits, insects, birds and small mammals, earthworms and also feeds on Agamid Lizard. It is first time captured in camera traps during All India Tiger Estimation exercise in 2022. During Phase IV Monitoring, 2023, it is again captured in camera traps from the same region (Golivane beat of Amba range) of Sahyadri Tiger Reserve.

WHITE-TAILED WOOD RAT

White-tailed wood rat *(Madromys blanfordi)* is an adaptable forest and scrub rat that is easily told apart by its bicoloured tail. This rat builds its nest in tree hollows, but adapts to building its nest in boulder crevices, too. In Sahyadri Tiger Reserve, the white-tailed wood rat is first time captured in camera traps during Phase IV Monitoring, 2023 from Pimpari beat of Bamnoli rage. It is certainly possible that other rodent species, which have not yet been captured on camera traps, could be recorded in the future from the Sahyadri Tiger Reserve.





GOLDEN JACKAL

Golden jackal *(Canis aureus)* is a medium-sized canid, a successful hunter, especially of rodents, and a scavenger. Its eerie howls are characteristic of the Indian countryside and jungle. They found in forests, grasslands, mangrove, urban and semi-urban areas and tolerates human presence, thus often seen around human settlements. In Sahyadri Tiger Reserve, the golden jackal is first time captured in camera traps from Kolhapur Nivale beat of Amba range during Phase IV Monitoring, 2024. Previously we didn't find golden jackal anywhere in STR. It is always observed in human landscape just outside the buffer zone.



Nilesh Patil
Ecologist,
Sahyadri Tiger reserve, Karad

STR-T1 Tiger from Microscopic Perspective

My name is Aditya Ranjit Lad from Belagavi, Karnataka. Currently, pursuing M.Sc. Bioinformatics (Second year) from Bharati Vidyapeeth's, Rajiv Gandhi Institute of Information Technology and Biotechnology, Pune. Since childhood, I was always been fascinated by wildlife, flora-fauna, behavior of animals and biodiversity. As result, I pursued my graduation in Zoology. I remember reading a small article in college time which described how the genetic composition can reveal the secret of entire habit, behavior, morphology, and health of an organism. Thus, with the curiosity to learn about wildlife through the sight of molecular biology, I decided to take up Bioinformatics as my Masters subject. After completing my first-year exam, I joined the Tiger Cell of Sahyadri Tiger Reserve for the summer internship (May-June 2024) with the reference of Planet Earth Foundation.




The Sahyadri Tiger Reserve (STR) is a unique conservation area in the northern Western Ghats of Maharashtra. However, the overlapping territories of human communities and wildlife in the buffer zones and corridors lead to increased human-wildlife interactions. Understanding prey preferences and habitat requirements is essential for the survival of



Scat collection on field



Hair extraction process in lab



Hair characters under compound microscope (400x)

these predators and the stability of their populations. For my internship, I was assigned with the research task, "To analyse hair samples from collected scats of Tiger and Co-predators for the identification of their probable prey species and preparing reference slides to develop a baseline data in Sahyadri Tiger Reserve."

I started my internship work on 6th May 2024. To collect the scat samples of tiger and co-predators, sampling kits (Zip-lock bag, silica gel and label) were distributed to 8 ranges of STR. Four Tiger scats and multiple leopard and dhole scats were collected. After the collection of scat samples, I focused on tiger scats of newly recorded STR-T1 tiger. The four tiger scats were processed to extract undigested hair of prey in laboratory. Further using a compound microscope, the micro-histological characters of hair were analysed at 400X magnification and data was maintained in a database. Additionally, hair samples of cattle and probable prey species were collected and a reference slide were prepared from Chandoli area. These characters allowed us to identify the prey species by comparing it to a reference slides.

The analysis of 4 Tiger Scats (TS-1 to 4) revealed the remains of 3 large ungulate species. The prey species identified from tiger scats were Bos taurus (Feral Cattle-Cow), Bubalus bubalis (Feral Cattle-Buffalo) and Bos gaurus (Wild ungulate-Gaur).



Aditya Lad
Intern, Tiger Cell,
Sahyadri Tiger Reserve, Karad

Scat No	Beat	Zone	Range	Date of collection of scats	Identified Prey Species After Analysis	Remarks
TS-1	Zolambi	Core	Dhebewadi	17-12-2023	Indian Gaur *(Bos gaurus)*	-
TS-2	Sidheshwar Purv	Core	Chandoli	22-01-2024	Buffalo *(Bubalus bubalis)*	Feral
TS-3	Chandel East	Core	Chandoli	01-03-2024	Cow *(Bos taurus)*	Feral
TS-3	Gothane	Core	Amba	29-04-2024	Cow *(Bos taurus)*	Feral

Table 2: Frequency of matched and unmatched hair of prey species in tiger scat (N = 4)




Figure 1: Identified prey species in 4 scats samples of STR-T1 Tiger

"DOES SAHYADRI TIGER RESERVE HAVE ENOUGH PREY BASE FOR TIGERS?"

"Does Sahyadri Tiger Reserve have enough prey base for Tigers?", this question became a topic of debate over a decade about the Sahyadri Tiger Reserve (STR). This question was raised while proposing the only tiger reserve in western Maharashtra and this question continued even after its establishment for over a decade. STR and its lead authorities and field officers has faced this question from all levels, from social, political to administrative authorities of district, division to state and central organizations. STR officers tried their best to answer this question for past 14 years in every possible way. We are proud of them and STR for fighting this issue for a long-time. But now it's time to answer this question in scientific way to conclude and covert this question into a tagline that "Yes, STR has enough prey base for tigers".



STR is situated in the mountain ranges of northern Western Ghats called "Sahyadri". Sahyadri boasts a long and glorious history of the world recognized emperor Chatrapati. Shivaji Maharaj. Sahyadri has unique historical, cultural and natural legacy. If we look back in history, Sahyadri has always been an unsolved mystery for outsider invaders, because they didn't understand the mystery and hidden treasures and strength of Sahyadri until they physically experienced it. Ultimately, Sahyadri played a crucial role in safeguarding the Maratha empire.


The mysterious Sahyadri holds tremendous natural treasures and which is a reason of being World Natural Heritage Site and Global biodiversity hotspot. Sahyadri Tiger Reserve is also recognized as Key Biodiversity Area (KBA), Important Bird Area (IBA), Important Medicinal Plant Area (IMPA) and also known as "Land of endemic species". These reorganizations have given to Sahyadri by global scientific organizations like UNESCO, IUCN, Birdlife International, Conservation International, etc by conducting years of scientific research. Hence, to reveal and understand the real hidden mystery of Sahyadri, we need a scientific vision. Let's look at Sahyadri Tiger Reserve and its facts from a scientific vision.

Prey Density in STR (REM Module)


The Wildlife Institute of India (WII) a national scientific institute conducted a scientific survey as a part of Tiger Recovery Project from 2017 to 2020. Using camera trap data and random encounter module (REM) framework. WII estimated the overall prey species density 23.25 to 29.55 (per sq.km at 95% CI) for 2017-2020 (table 1.1). To continue the on-gonging tiger and prey species monitoring, STR established a Tiger Cell in 2022. The research team of Tiger Cell continued the camera trap survey for 2022-23 and estimated the prey species density 26.43 per sq.km using REM module. Following data in table and graph shows the increase of overall prey density in STR from 2017 to 2022.







Graph B. Increase of Camera Trap Efforts over the years



Graph C. Graph shows prey species density increase in 2022 and 2023

Camera Trap Efforts

It was possible due to increase in wildlife monitoring efforts through camera traps in STR over the years (Graph. B).

Prey Density in 2022-2023:

Indian gaur, sambar, wild pig, barking deer, mouse deer and four-horned antelope are the major ungulate species considered as main prey species for tiger and co-predators in STR. The prey species individual densities were estimated using REM module on camera trap data for 2022 and 2023 as follows.

Independent Captures:


The density of wild pigs has increased significantly, from 7.164 to 18.4. In 2022, there were 1,425 independent captures of wild pigs, which rose to 2,608 captures in 2023. Gaur density increased from 7.064 to 9.11. Sambar density increased from 2.648 to 4.55. Barking deer density increased from 1.979 to 3.73. Mouse deer and four-horned antelope density also showed increase. The overall comparison of prey species density and independent capture (table 1.2) of 2022 and 2023 shows increase in prey species population. The result of prey species shows that habitat management, wildlife monitoring and habitat protection efforts has increased in STR over the years.

Feral Cattle as Additional Prey Base:

Cattle abandoned in the forest by relocated villages are known as feral cattle. There are camera trap records and field staff observations were major carnivores observed feeding on feral cattle in STR. Hence, they are considered as additional prey base for tiger and co-predators in STR. As per Phase IV survey conducted in 2022, the independent capture of feral cattle was 1043 and its occupancy was recorded in 23.79 % of area of STR.

Sr. No	Species	Independent Captures (2022)	Independent Captures (2023)
1	Indian Gaur	2026	2401
2	Wild Pig	1425	2608
3	Sambar	595	695
4	Barking Deer	652	730
5	Mouse Deer	209	266
6	Four-horned Atelope	11	29
7	Feral Cattle	1043	1567

Table 1.2. Table shows prey species independent captures of 2022 and 2023



Graph D. Graph shows prey species independent capture increase in 2022 and 2023











Status of Tigers:



Akash Patil
Ecologist,
Sahyadri Tiger Reserve, Karad

WII also conducted feasibility analysis for tigers and calculated carrying capacity of tigers based on current prey species population. As per the scientific estimation of WII, STR can provide home for up to 24 individual tigers.

An adult male tiger was recorded in Dec 2023, which stayed back in STR for past 6 months and field staff and STR tiger cell was able to monitor its movement continuously. It is a positive sign for the tiger recovery in STR. It is also indicated that there is enough prey species population in STR.

Reference:

- Sawant U. S, Patil A. B, Patil N. A, Ramanujam R. M, Patole G. N. Status of Tigers, Co-predators and Prey in Sahyadri Tiger Reserve, Maharashtra 2022. All India Tiger Estimation (AITE), 2022 Report.Ramesh K.,
- Gujar S., Jelil S.N., Gaykar A., Girkar N., Pal R.S., Raja G.A., Kale R. Vyas V. and Ben V.C. 2020. Tiger Recovery Strategy and Long-term Monitoring in Sahyadri Tiger Reserve, Maharashtra. Interim Technical Report (2018–2020). Wildlife Institute of India and Sahyadri Tiger Foundation. Pp 33.
- Jelil, S. N., Vasudeva, V., Sawant, U., Chavan, S., and Ramesh, K. (in preparation): Tiger Recovery Strategy and Long-term Monitoring in Sahyadri Tiger Reserve, Maharashtra (draft final report), 2021.
- Jelil, S. N., Gaykar, A., Girkar, N., Vyas, V., Ben, V. C. and Ramesh, K. (2020): Recent record of tiger from Sahyadri Tiger Reserve, India. CATnews 71: 16–17.
- Jelil, S. N., Paul, A., Gaykar, A., Girkar, N., Gujar, S., Ben, V. C., Hayward, M. W. and Ramesh, K. (in review): Riparian quality index as a tool to measure forest quality and support wildlife habitat management along the terrestrial-riverine continua. River Research and Applications.
- Jelil, S. N., Pal, R. S., Gaykar, A., Pokhariya, K., Raja, G., Sherwani, N., Girkar, N., Kale, R., Mujawar, A., Vyas, V., Ben, V. C. and Ramesh, K. (in preparation): Conservation implications and societal reluctance: challenges of restoring large carnivore population in a human-interspersed landscape.
- Jelil, S. N., Pal, R. S., Gaykar, A., Girkar, N., Sawant, U., Chavan, S., Ben, V. C. and Ramesh, K. (in preparation): Intensive camera trap surveys reveal rich mammal assemblage in Sahyadri Tiger Reserve, western India.



टायगर अभी जिंदा है



दिनांक १८.१०.२०२१ रोजी उंबरठाण प्रादेशिक (सध्याची मिनी गडचिरोली) वनपरिक्षेत्रातून बदलीने सह्याद्री व्याघ्र प्रकल्प मध्ये हेळवाक रेंजला जॉईन झालो. तेव्हापासून जसे क्षेत्रीय दौरे, विविध आढावा बैठकीस जावे लागले तसे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात स्थानिक वाघ नाहीत अशा बोचऱ्या टिकांनाही सामोरे जाण्याचा नित्यनियमच जणू चालू होता. कारणही तसचं, महाराष्ट्रातील एकूण ६ व्याघ्र प्रकल्पापैकी चौथा व्याघ्र प्रकल्प, पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव, वन्यजीवांची विविधता व प्रदेशनिष्ठ (Endemic) प्रजातींची रेलचेल असलेले, जागतिक नैसर्गिक वारसास्थळ, कोयना व चांदोली धरणाचे प्रचंड पाणलोट क्षेत्र, आणि मागील गत काळातील भारतातील सर्वात जास्त पावसाची नोंद झाल्याचे ठिकाणही याच प्रकल्पातले. इथला समृध्द निसर्ग पाहताना मन हरखून जायचे पण वाघ नसल्याची खंत पण वाटायची. या सर्व गोष्टी स्वप्नातच राहून जातात की काय असे वाटायचे? या प्रकल्पाचे उपसंचालक श्री. उत्तम सावंत बदली होण्याआधी एकदातरी आपल्या व्याघ्र प्रकल्पात वाघाचे अस्तित्व मिळावे अशी इच्छा असल्याचे नेहमी सांगायचे. मी माझ्या कार्यक्षेत्रात वाघाचे अस्तित्व दाखवणाऱ्यास रुपये ५०,०००/– बक्षीस जाहीर केले. आम्हाला मनोमणी जसे वाटत होते तसेच, व्याघ्र प्रकल्पातील एक प्रामाणिकपणे वनसेवा करणाऱ्या व विश्वासू रोजंदारी वनमजूर गौरव सोनारलाही वाटायचे. जंगलातल्या नेहमीपेक्षा वेगळ्या दिसणाऱ्या गोष्टींवर त्याची चाणाक्ष नजर असायची. ''कहते है, किसी चिझ को दिल से चाहो, तो पुरी कायनात उसे तुमसे मिलाने की कोशीश मे लग जाती है।'' अन् झालं ही तसंच.

योगायोगाने नव्हे तर विधीलिखीत घडणारचं होत. त्याप्रमाणे दिनांक ११.१२.२०२३ ला चांदोलीचा मला अतिरिक्त पदभार मिळाल्याबरोबर दिनांक १२.१२.२०२३ रोजी व्याघ्र प्रकल्पाच्या भूमीवर सह्याद्रीच्या वाघोबाने आमच्यासाठी गौरवास्पद 'पगमार्ग' उमटवले होते. अनुभवी गौरवकडून बातमी समजताच शाहनिशा करण्यासाठी वनपाल शिवाजी पाटील (मेजर) यांनी प्रत्यक्ष भेट देवून वाघाच्या ठशाचे फोटो घेऊन मला तात्काळ पाठवले. सोनार्ली नियतक्षेत्रातील चांदोली जलाशयाच्या काठावर ठसे मिळाल्याचे समजले आणि माझी उत्सुकता वाढली. या वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी नलवडे साहेब हे १ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी गेले होते. ठसे पट्टेरी वाघाचेच असल्याची खात्री झाली . गोड बातमी तात्काळ वरिष्ठांना कळविली. खुप आनंद झाला होता. माझ्याकडे चार्ज असल्याने शिवाय वाघ असल्याची बातमीने पुढील दिशा वरीष्ठांकडून समजून घेतल्यानंतर मी जायचे ठरवले. मी लगेच इकॉलॉजिस्ट आकाश पाटील व निलेश पाटील यांना याबाबत माहिती दिली व आम्ही तिघांनी त्या स्थळी जायचे ठरवले. यावेळी श्री. निलेश पाटील व आकाश पाटील यांनी जवळपास ४० ते ४५ ठिकाणी ट्रॅप कॅमेरे सोबत घेतले. सर्व कॅमेरे जंगलात लावणार होतो. सारथी निलेश साळुंखे यांनी कॅमेरे ट्रॅप व इतर सामान गाडीत ठेवून कॅमेरे ट्रॅप कुठे बसवायचे वाघ तर हेळवाक पर्यंत आला नसेल? या विचारात आमची गाडी जणू काही जंगलाच्या दिशेने धावू लागली होती. दिवस मावळतीला जाऊन आता अंधार पडायला सुरुवात झाली. आम्ही आता कोळणे संरक्षण कुटीवर होतो. रात्रीचे जेवण करुन पुढे निघालो. सोबत गणेश पवार नावाच्या वनमजूराला आम्ही सोबत घेतले. कधी काळी म्हणे अस्वलाशी झुंज दिलेला हा गणेश झुंजार वृत्तीचा आहे. रात्रीच्या अंधारात ट्रॅप कॅमेरे लावण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता. आकाश व निलेश कॅमेरे ट्रॅप लावत होते. आम्ही रात्रभर जवळपास ३५ ठिकाणी कॅमेरे लावले. आता उजडायला फक्त काही वेळच बाकी होता. आम्ही कोल्हापूर – निवळे नियतक्षेत्राच्या संरक्षण कुटीवर पोहोचलो. आता बऱ्यापैकी उजाडले होते. सात वाजले होते. आम्ही संरक्षण कुटीवरच झोपी गेलो. दोन तासातच पुन्हा उठून नाष्ट करुन उरलेले कॅमेरे लावण्यासाठी बाहेर पडलो. उद्देश हाच की यावेळी वाघाचा कॅमेरा ट्रॅप मध्ये फोटो मिळवायचाच.

उरलेले कॅमेरे लाऊन पुन्हा कोल्हापूर– निवळे संरक्षण कुटीवर आलो. थोडी विश्रांती घेऊन ज्याच्या साठी आलो होतो ते ठसे तपासण्यासाठी

आम्ही सोनार्ली कुटीकडे रवाना झालो. आम्हाला कुटी जवळून धरणाच्या दिशेने खाली उतरायचे होते. सोनार्ली कुटीचे वनमजूर आमच्या बरोबर होते. गाडी जिथपर्यंत जाईल तिथपर्यंत घेऊन गेलो. मग उतरुन चालायला सुरुवात केली. परिसर नवीन होता. पहिल्यांदाच या हा भाग मी फिरत होतो. तास दीड तास डोंगर उतरुन गेल्यावर आम्ही बऱ्यापैकी जलाशयाच्या जवळ पोचलो होतो. झाडी संपवून आम्ही पार खाली आलो होतो. जलाशयाचे पाणी थोडे खाली गेल्याने आम्ही या जागेतून कडे कडेने चालत होतो. यावेळी एका वनमजूराने ठसे आढळल्याची दिशा जशी दाखवली तशी माझी उत्सुकता शिगेला पोचली. खरंच ते ठसे वाघाचे असतील का? या विचाराने मी हर्षोल्हासित झालो होतो. निलेश पाटील हे पुढे होते. ते आता चालत त्या ठिकाणी पोचले होते. आमची नजरा नजर होताच माझ्याकडे पाहून दुरुनच त्यानी थम्स अप केला आणि मला कधी एकदा तिथे पोचतो आहे असे झाले. दोन मिनीटातच मी तिथे पोचलो आणि पाहतो तर काय? भले मोठे ठसे. आणि तेही वाघाचे. हो वाघाचे! अद्भूत, कमाल, आश्चर्य! सह्याद्रीत वाघाचे ठसे पाहणे ही खूपच स्वप्नवत होती. आनंदाने आम्ही एकमेकांचे अभिनंदन केले. खूप सारे फोटो काढले. हा सुंदर क्षण एक एक करीत आम्ही आमच्या कॅमेऱ्यात कैद करत होतो. माझ्या आनंदाला पारावर उरला नाही. माझ्या जीवनातील माझे हे पहिलेच असे टायगर ट्रॅकींग होते. अशाप्रकारचा अनुभव यापूर्वी मी कधीच घेतला नव्हता. बराच वेळ तेथे व्यतीत केल्यावर आम्ही माघारी जायचे ठरवले. आम्ही केलेली उतरण आता चढण झाली होती. चढण चढताना सर्व जण घामाघुम झालो होतो. पण मिळालेल्या या अमूल्य आठवणींच्या जोरावर ती चढण आम्ही आनंदाने पार केली.




परतीच्या मार्गावर असताना आम्ही काल रात्री लावलेले कॅमेरे वाघ दिसेल या आशेने एक एक करत तपासत होतो. सर्व कॅमेरे तपासून झाले तरी ज्याला कॅमेरात कैद झाल्याचे पाहायचे होते, तो मात्र झालाच नाही. एक रात्र आणि एक दिवस फिरुन आम्ही परत निघालो. तिसऱ्या दिवशी मी पुन्हा वन्यजीव सेवेच्या ज्ञानाचा दांडगा अनुभव असलेले उत्तम सावंत सर (आमच्यासाठी मारुती चितमपल्लीच) व स्नेहलता मॅडम पाटील यांच्या समवेत वाघोबाच्या ठश्यांचा मागोवा घेत होतो. गावठाण दुर्गेवाडी देवराई येथे वाघाच्या ठश्यांचा माग संपला होता. अन् अनेक मगरींचे वास्तव्य असलेची ख्याती असलेल्या चांदोली धरणाने येथून पुढे रस्ता नाही अशी सूचनाच जणू काही केली. पण आमच्यासोबत असलेले उत्तम चितमपल्ली यांची पावले कुठे थांबणार होती? कुठेतरी काहीतरी मिळेलच म्हणून बोट दुसऱ्या काठावर (ढेबेवाडी वनक्षेत्रात) इथेइथे न्या म्हणून सांगितल अन् जेथे बोट थांबवली तेथेच ठसे मिळाले. सरांना व वाघोबाला काय म्हणावं? दोघेही आपल्या शास्त्रात पारंगत. तोंडात बोट गेले. आश्चर्याचा पुन्हा सुखद धक्का वाघोबाने दिला. अजस्त्र मगरींच्या राज्यातून अंदाजे ३००-४०० मी. पोहून झोळंबीच्या जंगलात शिरकाव केला होता. वाघाचा मागोवा घेता घेता जेथे जेथे पगमार्क मिळतील तेथे नोंद करुन फोटो काढणे चालू होते. याठिकाणी वाघाच्या ठश्यासोबत बसून मी व सारथी सुनील यांनी फोटो काढले. आम्ही नुसतं फिरत होतो पण जंगलाच्या राजाचे दर्शन काही झाले नाही. तसे ते दुर्मिळच!

१७ डिसेंबर ला सोनार्ली, ढाकाळे, झोळंबी, सिध्देश्वर बॅकवॉटर ला टायगर ट्रॅकिंग करुन माझे आवडते आकर्षण असलेले आंबोळे बॅकवॉटरच्या वाघोबाचे ठसे पुन्हा पाण्यात उतरताना दिसले. जे की दुसऱ्या बाजूने सोनार्ली, ढाकाळेच्या बॅकवॉटर ला चढताना दिसले. माझ्यासहित सर्वजण आश्चर्यचकीत झाले . अंदाजे अंतर १ ते १.५ किमी पोहलेले असावे! आम्ही सह्याद्रीत सुंदरबनचा अनुभव घेत होतो. वाघोबा आमची उत्कंठा वाढवतच राहिला. तेथून पाय काय निघत नव्हता. खुप भूक लागली होती. सायंकाळचे ५.०० वाजले होते. मसंरक्षण कुटीवर जाऊन जेवण केले आणि मुख्यालयात परतलो. वाघोबाचा मागोवा घेणे आता नित्यनियमाचे झाले होते.

यानंतर आकाश व निलेश यांनी कर्मचाऱ्याच्या मदतीने संपूर्ण चांदोली मध्ये ठिकठिकाणी कॅमेरे लावले. त्यांची मेहनत फळाला आली. दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी वाघोबाचा पहिला फोटो कॅमेरात कैद झाला. (जो की आम्ही १४ डिसेंबर च्या पहाटेला साळींदर बोर्डाजवळ ४-५ वाजेच्या दरम्यान लावला होता.) आमच्या वरीष्ठ आदरणीय स्नेहलता पाटील मॅडम यांच्या लगेच फोन आला. आमची मेहनत फळाला लागली. यासाठीच त्यांनी कौतूकाची थाप देणेकरिता शुभसंदेश दिला. बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघ असल्याची पुन्हा एकदा फोटोसहित खात्री झाली. खरचं! वाघ दिसत नसतानाही त्याला पाहायचे कसे असते हे मी या घटनेतून शिकलो. निसर्ग - जंगल- वन्यप्राणी अनुभव खरंच खूप आनंदी व उत्साहवर्धक असतं आणि हे भाग्य आमच्या सारख्या वन अधिकाऱ्याला मिळतं! हे असे क्षण कायमस्वरुपी लक्षात राहतात. मनाच्या एका कोपऱ्यात कायम स्वरुपी घर करुन राहतात. अतिरिक्त कार्याभाराच्या या प्रवासात इकॉलॉजिस्ट निलेश व आकाश पाटील, वनपाल शिवाजी पाटील, विजय दाते, भारत खुटाळे, वनरक्षक अमित जमादार, अशोक बोटे, गजानन सकट, सुभाष वसावे, सारथी विलास नांगरे, हरिष खंडांगळे, बंटी सपकाळ, निलेश साळुंखे, वनमजूर गौरव सोनार, हरिबा वडाम, दशरथ माने, गणेश पवार आणि आमच्या जंगलाचे भिष्माचार्य ज्ञानदेव परीट यांनी आयुष्य भराची आठवण रहावी अशी साथ दिली.





आता उलट म्हटले तरी चालेल दिनांक १२.१२.२०२३ पासून ते आजतागायत वाघोबा आमच्यावर नजर ठेवून आमचा मागोवा घेत आहे.



संदीप जोपळे
वनक्षेत्रपाल, हेळवाक,
सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड

थोडक्यात चुकलेली भेट... सह्याद्रीच्या राजाची !



सह्याद्री व्याघ्र राखीवमध्ये २०११ व त्यानंतर २०१८ साली २-४ ठिकाणी वाघांचे फोटो आले होते. आणि नंतरच्या काळात वाघाचे कोणतेच अस्तित्व जाणवले नव्हते. अचानक डिसेंबर २०२३ मध्ये गस्तीवरील मजूरांकडून निरोप आला की, सोनार्ली नियतक्षेत्रात वारणा जलाशयाच्या काठी वाघाचे ठसे मिळाले आहेत. ही बातमी मिळताच, संपूर्ण कर्मचारी – अधिकाऱ्यांच्यात एक आनंदाची लहर संचारली होती. वाघाचे ठसे अन् कॅमेरा ट्रॅपमध्ये फोटो मिळवण्यासाठी सर्व कर्मचारी कामावर लागले आणि शेवटी दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी या वाघाचा कॅमेरा ट्रॅप मध्ये फोटो मिळाला. त्यानंतर सर्वजण या वाघाच्या हालचालींचा मागोवा घेण्याच्या कामांवर लागले.

सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड अंतर्गत उपसंचालक कोयना मा.श्री. उत्तम सावंत सर, उपसंचालक चांदोली मा. श्रीमती स्नेहलता पाटील मॅडम व वनपरिक्षेत्र आंबा चे वनपरिक्षेत्र अधिकारी मा.श्री.अमृत शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली वन्य प्राण्यांचे साठी ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले होते. दररोज या ट्रॅप कॅमेरांची तपासणी देखील केली जाते. आज दि. २९ जानेवारी २०२४ होती. दिवसभरातील इतर काम संपल्यावर सायंकाळी उदगिरी नियतक्षेत्रातील ट्रॅप कॅमेरे व पीआयपी तपासणीसाठी मी व माझे सहकारी वनरक्षक श्री. विशाल पाटील व उदगिरी नियतक्षेत्राचे वनसेवक श्री. संजय वडाम व श्री. विवेक तेली यांचे सोबत निघालो सायंकाळची वेळ असल्याने आमच्या आवडीचा व अतिशय घनदाट जंगलातून जाणारा एक रस्ता आहे, पायदळ गस्तीकरिता त्याची निवड केली. आम्ही या रस्त्याला 'वाघ मार्ग' असे म्हणतो. हा रस्ता पूर्वी रत्नागिरी जिल्ह्यातील गोठणे गाव व कोल्हापूर जिल्ह्यातील उदगिरी गावास घनदाट जंगलातून जोडणारा रस्ता होता. आता गोठणे पुर्नवर्सन झाले आहे. त्यामुळे या रस्त्याच्या वापर कमी झाला आणि रस्त्यावर कारवी आणि इतर झुडूपाचे जंगल वाढून तो बुजून गेला होता. संरक्षणाच्या व संनियंत्रणासाठी हा रस्ता खूप उपयुक्त होता म्हणून, तो रस्ता दुरूस्तीकरिता घेतला होता. सध्या या रस्त्याचे दुरुस्तीचे काम सुरू असल्याने रस्त्यावर पूर्णपणे माती पसरलेली होती. रस्त्यावरून जात असताना आमच्यात चर्चा देखील झाली की या मऊ मातीच्या वाटेवरुन जाताना आपला सह्याद्रीचा राजा खूप समाधानी होईल. आमच्यात चर्चा सुरू असतानाच काही अंतरावर अचानक या वाघाचे ठसे दिसून आले. ठश्याच्या आकारावरुन हा ठसा पूर्ण वाढ झालेल्या नर जातीच्या वाघाचा असल्याचे आमच्या लक्षात आले. नेहमी गस्त करत असताना एखादा

वाघाच्या पंजाचा ठसा मिळावा म्हणून डोळे खूप आतुरलेले असायचे, पण आज या मऊ मातीवर उमटलेली ताज्या ठशांची भली मोठी रांगच मिळून आली. ठसे इतके होते की कोणत्या ठशाचा फोटो घेऊ आणि कोणत्या नको असे वाटत होते. जो जो ठसा आवडेल, त्याचा फोटो घेत पुढे पुढे जात होतो. पुढे जाऊन ट्रॅप कॅमेरा उघडून त्यामध्ये वाघाची छबी आली आहे काय हे पाहण्यासाठी आम्ही सर्वच आतुर झालो होतो. आम्ही लावलेल्या ट्रॅपकॅमेऱ्या जवळ आलो. ट्रॅप कॅमेरा उघडून पाहिला असता तो काही तांत्रिक कारणामुळे बंद होता. आणि आमच्या सगळ्यांची निराशा झाली. दोन–चार वेळा कॅमेरा उलटा–पालटा करुन पाहिला. परंतु, आमचा नाईलाज झाला होता. पण याच रस्त्यावर अजून दोन कॅमेरे असल्यामूळे आमच्या आशा अजूनही पल्लवीत होत्या.

आम्ही पाहिलेला ट्रॅप कॅमेरा पुन्हा एकदा व्यवस्थित सुरु करून आम्ही पुढे मार्गस्थ होणार एवढ्यात एका वानराने मोठ्याने आलार्म केला. आम्ही सावध झालो. आणि सावधानतेने पुढे पुढे मार्गस्थ झालो. त्यावेळी आम्ही चालण्यास सुरुवात केल्यानंतर पुन्हा एकदा वानराने मोठ्याने खेकसण्याचा अवाज दिला. वानराने आम्हाला दोन वेळा सावध केले परंतु, जवळपास एखादा बिबट्या असावा, असा अंदाज बांधून आम्ही या घनदाट जंगलातून पायवाटेने सावधतेने पुढे पुढे जात होतो. या रस्त्यावरील आमचा दुसरा कॅमेरा आला. आम्ही घाईगडबडीने तो कॅमेरा चालू करुन वाघाची छबी आली आहे का ते पाहण्याचा प्रयत्न केला. परंतु या कॅमेऱ्यामध्ये देखील वाघाचा फोटो आला नव्हता. आम्ही इतरत्र मागोवा घेतला तर वाघ या कॅमेरा समोरुन न जाता कॅमेऱ्याच्या मागील बाजूने असणाऱ्या दाट झाडोऱ्यातून चालत जावून पुढे पुन्हा मुख्य रस्त्यावर आला होता. त्यामुळे आम्ही पुन्हा नाराज झालो. सह्याद्रीच्या राजाने पायाचे ठसे उठवून आम्हाला खूप आनंदी केले होते. परंतु दोन्हीही कॅमेऱ्यामध्ये त्याची छायाचित्र न आल्याने आम्ही खूप नाराज होऊन पुढे जात होतो. परंतु शेवटचा एक आशेचा किरण आमच्या जवळ होता. तो म्हणजे याच रस्त्यावर आम्ही लावलेला शेवटचा कॅमेरा. आम्ही कॅमेरा जवळ पोहोचलो. परंतु या कॅमेज्यास स्क्रीन नसल्यामुळे जागेवर फोटो तपासता येत नव्हते. म्हणून त्यातील मेमरी कार्ड घेऊन आम्ही संरक्षणकुटीवर परतलो.

वाघ आपल्या कॅमेऱ्यामध्ये न आल्याने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. परंतु मिळालेले ठसे इतके सुंदर आणि मनमोहक होते की काही अंशी आम्ही खुश होतो. मजुर कुटी वर येऊन आमच्या जवळील लॅपटॉपमध्ये ते मेमरी कार्ड घातले आणि पाहतो तर, मावळत्या सूर्याच्या किरणांमध्ये चमकणाऱ्या वाघांचे मनमोहक छायाचित्रे या शेवटच्या ट्रॅप कॅमेऱ्याने टिपले होते. आम्ही सर्वजण खूप खूष झालो. पण त्याहूनही आश्चर्याचा धक्का म्हणजे ट्रॅप कॅमेरा मधील इमेजची वेळ पाहिली तर सदरचा वाघ आमच्या पुढे पुढे चालत होता आणि आम्ही त्याच्या मागे मागे, त्याच्या पायाचे ठसे बघत बघत पुढे जात असल्याचे आमच्या निर्दशनास आले. कदाचित आम्ही पाच दहा मिनिटं जरी लवकर निघालो असतो तर वाघाचे दर्शन प्रत्यक्षात झाले असते. पण आमच्या नशिबाने या सह्याद्रीच्या राजाच्या दर्शनाची हुलकावणी दिली होती. पश्चिमेकडून अंगावर पडलेल्या सोनेरी प्रकाशातील वाघाचे चालताना ट्रॅप कॅमेराने टिपलेले छायाचित्र मी आयुष्यभर जपुन ठेवीन व ही अविस्मरणीय घटना सैदव लक्षात राहिल. गस्तीच्या वेळी असेच त्याचे प्रत्यक्ष दर्शन होईल ही आशा मनी बाळगून या सह्याद्रीच्या खोऱ्यातील असंख्य रानवाटा सह्याद्रीच्या या राजाच्या दर्शनासाठी आम्ही सातत्याने तुडवत राहू असं ठरवून आम्ही शांत झोपी गेलो.



सुरेश चरापले
वनपाल,
उदगिरी, वनपरिक्षेत्र आंबा









जंगलाचा आत्मा !

बारमाही पाणवठे

पावसाळ्यात पाणी जंगलात सर्वत्रच उपलब्ध असतं. जंगलातील नाले वाहत असतात. ठिकठिकाणी खड्ड्यांमध्ये, बंधाऱ्यामध्ये पाणी साठलेलं असतं. हिरव्यागार चाऱ्यांमधूनही शरीराला पाणी मिळत असतं. पाऊस पडला की सगळीकडे पाणी पाणी होतं. उन्हाळभर उष्णतेनं तहानलेला जीव आणि तापलेलं शरीर पावसात ओले–चिंब झाल्यामुळे सुखावून जातं. हिवाळ्याच्या सुरुवातीला नाले हळूहळू आटू लागतात. नाले बारीक धार होऊन वाहू लागतात, पाण्याची डबकी सुकू लागतात. डिसेंबर नंतर जंगलात फक्त काही हंगामी नैसर्गिक पाणवठ्यात व खात्रीच्या बारमाही नाल्यातच पाणी शिल्लक राहते. पावसाळ्यात संपूर्ण जंगलात पसरलेलं वन्यजीवन हळूहळू पाणवठयाभोवती जमू लागतं. जिथं पाणी नाही, ते जंगल प्राण्यांविना सुनं सुनं होऊ लागतं. जंगलाच्या काठावरचे प्राणी बाजूच्या रानशिवारात पाण्यासाठी भरकटून जातात. मार्च नंतर हंगामी पाणवठे सुध्दा आटून जातात.आता पाणी फक्त जंगलातील बारमाही नैसर्गिक पाणवठे आणि वनविभागाने खास प्राण्यांसाठी बनविलेले कृत्रिम पाणवठ्यांमध्येच शिल्लक राहते. प्राणी पुन्हा कमी राहीलेल्या पाणवठ्यांभोवती एकवटतात. अशावेळी एकाच ठिकाणच्या अधिवासांचा वापर वाढल्याने त्यावरील ताण वाढतो व अधिवासाचा ऱ्हास होऊ लागतो. उन्हाळ्यात



प्राण्यांचे पाण्याविना आबाळ होते. सुरक्षित जंगल सोडून पाण्यासाठी मानवी वस्तीत वणवण फिरावे लागते. असुरक्षित मानवी भागात गेल्यावर माणसाची नजर पडल्यास पळापळ करावी लागते. त्यामुळे उन्हाळा हा ऋतू प्राण्यांसाठी फार जोखमीचा होऊन जातो. म्हणूनच उन्हाळ्यात पाणवठे सर्व जंगलात समसमान राहतील, यासाठी पाणवठ्याचे अभ्यासपूर्ण समान वितरण करणे आवश्यक असते.

वन्यजीव व्यवस्थापनात अधिवास विकास करुन तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढविणे हे उद्दीष्ट असते. तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढली कि, आपोआपच मांसभक्षी प्राण्यांची संख्या वाढते. अधिवास विकासात आपण कुरणविकास, तणनिर्मूलन, फळझाडांचे वृक्षारोपण इत्यादी कामे करतो. परंतु, अशा अधिवासात उन्हाळ्यात पाणी उपलब्ध नसेल तर वन्यप्राणी तो अधिवास सोडून जातात आणि त्या अधिवासाची संपूर्ण धारण क्षमता वापरुन वन्यप्राण्याची संख्या वाढविण्याच्या आपल्या उद्दीष्टवर परिणाम होतो. परिणामी मांसभक्षी प्राण्यांचीही संख्या मर्यादीतच राहते. म्हणून वन्यजीव व्यवस्थापनातील बारमाही पाणवठ्याचे व्यवस्थापन हा सर्वात मूलभूत घटक आहे. त्याकडे सर्वांनी प्रामाणिकपणे लक्ष दिले पाहीजे.

पाणी हेच जीवन

पृथ्वीवर पहिला सजीव पाण्यातच जन्माला आला. पाण्यातच वाढला. एका जीवांपासून विविध जीव उत्क्रांत झाले. काही जीव पाण्याच्या बाहेर पडले. मग जमिनीवर सजीवांचा प्रवास सुरु झाला. हळूहळू संपूर्ण पृथ्वीवर सजीव फिरु लागले. परंतु, त्यांचं पाण्याशी नांत कायम राहीलं. बहुतेक सर्व जीव पाण्याशिवाय राहू शकत नाहीत. प्रत्येकाच्या शरीरात पाण्याचा अंश सर्वात जास्त आहे. आणि तो संतुलित ठेवण्यासाठी रोज पाणी प्यावं लागतं. म्हणूनच पाण्याला जीवन म्हटलं आहे. मानवी संस्कृती नदीकाठीच जन्माला आली आणि फुलली. मानवानं आपली पाण्याची गरज भागविण्यासाठी नद्या–नाले अडवले. धरणे बांधली आणि त्या पाण्यावर आपला विकास केला. एका ठिकाणी साठलेले पाणी शेकडो किलोमीटर नेऊन तिथल्याही भागाचा व लोकांचा विकास केला. पाणी हे फक्त माणसाचीच नाही तर प्रत्येक

सजीवांची प्राथमिक गरज आहे. मधमाशांपासून–हत्तीपर्यंत पाणी सर्वांना आवश्यक आहे. म्हणून वन्यजीव व्यवस्थापनात वन्यजीवांसाठी जंगलाच्या सर्व भागात पाण्याची उपलब्धता करुन देण्यास प्राधान्य असते. तहानलेल्याला पाणी देणं हे भारतीय संस्कृतीत सर्वात मोठं 'पुण्य' मानलं जात. प्रत्येक सजीवाला किमान दिवसांतून एकदातरी पाणी पिण्याची गरज असते. पाणी जर मिळालं नाही, तर तो वन्यजीव पाण्याच्या शोधात आपलं सुरक्षित क्षेत्र सोडतो आणि असुरक्षित मानवी क्षेत्रात त्याला पाण्यासाठी राहावं लागतं.

वन्यप्राण्यांसाठी संवदेनशील ऋतू : उन्हाळा

'पाण्याची उपलब्धता' हा प्रत्येक वन्यप्राण्यांच्या वितरणाची 'मर्यादा' ठरवणारा घटक आहे. तसेच, उन्हाळा हा ऋतू पाण्याच्या उपलब्धतेवरती मर्यादा आणणारा ऋतू आहे. त्यामुळे उन्हाळा हा वन्यजीवांसाठी 'संवदेनशील ऋतू' आहे. पाण्यासाठी त्यांना सुरक्षित क्षेत्र सोडून धोकाग्रस्त क्षेत्रात जावं लागतं, तिथेंच राहावं लागतं. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या परिसरातील वन्यजीवांसाठी आपल्या अंगणात, राहात असलेल्या परिसरात, शेतात पाण्याची सोय केली पाहिजे. प्रत्येक वनअधिकाऱ्यानेही आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक भागात पाणवठ्याची व त्यांना पाण्याने नियमित भरण्याची सोय केली पाहिजे. वन्यजीवांना जंगलातच पाणी मिळाले तर जंगलातच राहतील. वन्यजीव जंगलातच राहीले तर सुरक्षित असतील परंतु, त्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीत यावे लागले तर मात्र मानव–वन्यप्राणी संघर्ष वाढेल आणि त्यांच्या जीवाला धोकाही वाढेल.



बारमाही पाणवठे : जंगलाचा आत्मा

उन्हाळ्यात पाणवठे म्हणजे जंगलाचा जीव असतो. जंगलाचे प्राणीजीवन या पाणवठ्याभोवती गोळा होतं. उन्हाळ्यात बऱ्याच प्राण्यांना दिवसातून किमान दोन वेळा, तर काहींना किमान एकदा तरी पाणवठ्यावर यावंच लागतं. वाघ तर, ऊन खाली होईपर्यंत पाणवठे सोडायला तयार होत नाहीत. अगदी लहानातील लहान किटकं, मधमाश्या, पक्षी, सरपटणारे प्राणी, साप, छोटे प्राणी इ. यांनाही पाण्याची प्रचंड गरज असते. कोणाला शरीर थंड करणेसाठी, तर कोणाला शिकार मिळविणेसाठी, कोणाला चिखलामध्ये लोळण्यासाठी आणि सर्वात महत्वाचे सर्व वन्यजीवांना पाणी पिण्यासाठी या पाणवठ्यांची गरज लागतेच. जंगलात पूर्ण उन्हाळ्यात वन्यजीवांच्या जीवन मरणांचा खेळ याच पाणवठ्याभोवती खेळला जात असतो. चोवीस तास या पाणवठ्यावर वन्यजीवांची वर्दळ चालू असते. प्रत्येकाची वेळ फक्त वेगळी असते.

बारमाही पाणवठयांचे नियोजन

जंगलातील सर्व अधिवासात वन्यप्राण्यांची संख्या वाढविणे हे वन्यजीव व्यवस्थापनाचे प्राथमिक उद्दिष्ट असते. जंगलाच्या सर्व भागात पाणी वर्षभर उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याकरिता पाणवठ्याचे नियोजन अंत्यत अभ्यासपूर्वक करणे आवश्यक आहे. स्थानिक कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थ यांना असलेलं स्थानीक भागांच ज्ञान व नवीन तंत्रज्ञानाचा योग्यरित्या वापर केला तर सर्वत्र वन्यजीवांसाठी पाण्याची सोय करणे सोपं आहे. जंगलातील पाणवठ्याचं सर्व भागात समान वितरण



असणे आवश्यक आहे.

साधारण चार चौ.किमीच्या ग्रीड मध्ये एकतरी बारमाही पाणवठा असावा, असे आदर्श दिशानिर्देश आहेत. काही तंज्ञाच्या मते जंगलातील लहान मोठे जीव १.५ ते २.० किमी पर्यंत पाणी शोधू शकतात. त्यामुळे बारमाही पाणवठ्यांचे अशा पध्दतीने नियोजन करावे की प्राणी कोणत्याही दिशेला गेला तर त्यास १.५ ते २.० किमी वर पाणी मिळेल. प्रत्येक वन अधिकाऱ्याने त्याच्या कार्यक्षेत्राच्या अस्तित्वातील हंगामी व बारमाही पाणवठ्याचा चार चौ. किमी ग्रीडचा नकाशा तयार करुन ज्या ग्रीड मध्ये बारमाही पाणवठा नाही, असे ग्रीड नवीन पाणवठ्यासाठी निवडावेत किंवा प्रत्येक बारमाही पाणवठ्याभोवती १.५ ते २.०० किमी व्यासाचे वर्तुळ टाकून सुटलेल्या वर्तुळाबाहेरील क्षेत्रात नवीन पाणवठ्याचे नियोजन करावे. हे नियोजन करताना तेथील भूपृष्ठभाग, उतार, पाण्याचा स्त्रोत, पोहोच रस्ता इत्यादी बाबींच्या मर्यादेमुळे काही भागात पाणवठे करण्यावर मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे अशा भागात स्थानिकांशी चर्चा करुन पाणवठयासाठी नियोजन करुन पर्याय शोधणे आवश्यक आहे.

बारमाही पाणवठयांची निर्मिती

जंगलात पाणवठे बनविताना प्रथम नैसर्गिक हंगामी पाणवठे बारमाही कसे करता येतील, नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत वापरुन जास्तीत जास्त ठिकाणी पाण्याची सोय कशी करता येईल यावर भर दिला पाहीजे. कृत्रिम पाण्याचे स्त्रोत यांची कायम दुरुस्ती/रखरखाव असल्यामुळे ते बेभरवशाचे असतात आणि प्राण्यांना पाणवठ्यावर एक दिवस जरी पाणी मिळाले नाही, तर वन्यप्राणी पाण्याच्या शोधात तो भाग सोडून इतरत्र जातात. बऱ्याच ठिकाणी बोअरवेल व सोलर पंप वर आधारित कृत्रिम पाणवठे आहेत. ज्याठिकाणी बोअरवेल मशीन जाऊ शकते अशाच ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करणे शक्य आहेत. तसेच, बोअरवेल किंवा सोलर पंप यामध्ये कोणताही तांत्रिक बिघाड झाल्यास जंगलात दुरुस्तीकरिता लवकर मनुष्यबळ मिळत नाही. त्याचा फटका वन्यप्राण्यांना बसतो. ज्याठिकाणी बोअरवेल मशीन जाऊ शकत नाही. अशा ठिकाणी विहीर करुन त्यावर सोलर पंप बसवून वन्यप्राण्यांना पाणी देवू शकतो. पाईपलाईनने विहीरीचे पाणी दूरवर नेऊनही पाणवठे बनवू शकतो. तसेच, जंगलातील जुन्या विहीरी शोधून गाळ काढून पाण्याची उपलब्धता वाढवू शकतो.







जंगलातील पाणवठ्याच्या व्यवस्थापनाकरिता लक्षात घ्यावयाची मूलभूत तत्वे

१. कोणताही पाणवठा एक दिवस सुध्दा पाण्याविना रिकामा राहू नये.
२. जंगलाच्या सर्व क्षेत्रात पाणवठ्याचे समान वितरण असावे. एकाच भागात पाणवठ्यांची गर्दी नको.
३. पाणवठे हे बारमाही स्वरुपाचे असावेत.
४. सर्व पाणवठे मानवी हस्तक्षेपापासून मुक्त ठेवावेत.
५. माणूस, गुरे, कुत्री यांचा अशा पाणवठयावर हस्तक्षेप नसावा.
६. पाण्याचे स्त्रोत जास्तीत जास्त नैसर्गिक असावेत किंवा कृत्रिम असतील तर ते भरवशाचे असावेत.
७. हंगामी नैसर्गिक पाणवठयांना बारमाही करण्याचा प्रयत्न असावा.
८. कृत्रिम पाणवठ्यांना अवैध पाण्याचा स्त्रोत बंद झाला तर, तात्काळ पर्यायी पाणी भरण्याचे नियोजन असावे.
९. पाणवठ्यांवरती अवैध शिकार होण्याची सर्वात जास्त शक्यता असल्यामुळे, पाणवठ्यांची सुरक्षा कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्षीत करु नये.

बारमाही पाणवठ्यांचे व्यवस्थापन

पाणवठ्यांच्या व्यवस्थापनात पाण्याचा स्त्रोत, पाणी साठवण्याची रचना आणि पाणी स्त्रोतापासून पाणवठ्यापर्यंत वाहून नेणारी यंत्रणा या तीन घटकांचा समावेश होतो. तीनही गोष्टी अत्यंत भरवशाचा असायला पाहीजेत. उन्हाळ्यात या तीनही बाबीवर संरक्षित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे नियमित लक्ष असायला हवे. जंगलात पाण्याचा स्त्रोत हा नैसर्गिक व कृत्रिम असू शकतो. नैसर्गिक पाणवठ्याच्या स्त्रोतात बारमाही किंवा हंगामी झरे, बारमाही नाले, नदी–नाल्यातील डोह इत्यादी असू शकतात. तर कृत्रिम स्त्रोतात बोरवेल, विहीर, तळी, बंधारे इत्यादी असतात. पाण्याच्या स्त्रोतापासून पाणी साठविण्याच्या ठिकाणापर्यंत नेण्यासाठी उताराचा (ग्रॅव्हीटीचा) उपयोग केला जाऊ शकतो किंवा सोलार/ इलेक्ट्रॉनिक/ डिझेल/ पेट्रोल पंप वापरू शकतो. प्राण्यांना पाणी पिण्यासाठी साठविणेकरिता पाणवठे तयार करणे आवश्यक आहे. जिथे चिकणमाती खूप खोल पर्यंत आहे. त्याठिकाणी खड्डे काढून सरळ खड्ड्यात पाणी सोडू शकतो आणि पाणी भरपूर उपलब्ध असल्यास ते काम कमी खर्चिक असते. बऱ्याच ठिकाणी पाणवठे हे बशीच्या आकाराचे सिमेंट मध्ये बनवितात. बऱ्याचदा अशा पाणवठ्यामध्ये खुरे असलेल्या प्राण्यांचे पुढचे पाय शेवाळलेल्या सिमेंट वरुन घसरु नयेत म्हणून त्यावर खडी / दगडाचे तुकडे लावतात. त्यामुळे प्राण्यांच्या खुरांना ग्रीप मिळते. आता स्वस्तात व नैसर्गिक दिसणारे पाणवठे पण बनविता येतात. यामध्ये खाली गवताचा थर व त्यावर प्लास्टिकचा कागद व दगडांचे / विटाचे थर (Pitching) रचून कमी खर्चात छान पाणवठे बनतात. याशिवाय वेगळ्या तंत्रज्ञानाचा वापरही करु शकतो. फक्त वन्यप्राण्यांना बारमाही पाणी मिळाले पाहिजे एवढेच उद्दीष्ट आहे.

पाणवठ्यांची सुरक्षा

सजीवांना जगण्यासाठी पाणीही अंत्यत आवश्यक आहे. म्हणून सर्व वन्यजीव हे पाण्याच्या शोधात भटकत असतात. अशा वेळी 'जीवनदायी' पाणवठे हे यांच वन्यजीवासाठी 'जीवघेणे' ठरतात. चोरट्या शिकाऱ्यांकरिता उन्हाळ्यात हे पाणवठे सहज शिकार मिळविणेची मुख्य ठिकाणे (हॉटस्पॉट) ठरतात. शिकाऱ्यांकडून पाणवठ्यात कधी युरिया तर कधी विषारी औषधे टाकून प्राणी मारले जातात. तर कधी पाणवठयावर येणाऱ्या रानवाटा/सगरीवर सापळे, वाघरी, जाळे इ. लावून प्राण्यांची शिकार केली जाते. काही शिकारी बंदूकीचाही वापर करतात. त्यामुळे पाणवठे हे वन्यप्राण्यांसाठी 'जीवनदायीनी' आहेत. परंतू, नियमित पाणवठ्यांची व त्याभोवतीच्या अर्धा ते एक किमी त्रिज्येच्या भागाची व त्यातील सगरी /पायवाटा कसून तपासणी केली नाही तर हेच पाणवठे वन्यप्राण्यांसाठी 'प्राणघातक' ठरू शकतात.

पाणवठा माहात्म्य

उन्हाळ्यात हे पाणवठे प्रत्येक वन्यजीवांच्या जीवनातील अविभाज्य घटक असतात. प्रत्येक वन्यजीव दिवसाच्या कोणत्याना कोणत्या वेळी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी पोहचतोच. तसेच, काही वन्यप्राणी पाण्यात बसून आपले तापलेले शरीर थंड करतात, काही वन्यप्राणी पाणवठ्याजवळ झालेल्या चिखलात लोळण घेतात. काही प्राणी पाणी पिऊन क्षणात नाहीसे होतात. तर काही वन्यप्राणी शिकारी प्राण्याच्या तावडीत सापडतात. उन्हाळ्यात सर्व वन्यजीवनचं या पाणवठ्यांभोवती एकवटलेले असते. म्हणूनच पाणवठे हा जंगलाचा आत्मा आहे. उन्हाळ्यात सर्व पाणवठे हे काही वन्यप्राण्यांसाठी 'चक्रव्यूह' असतात. पाणवठ्यांपर्यंत पोहोचणे आणि सुखरूप जीवंत परत बाहेर येणं हे प्रत्येक प्राण्यांसाठी त्याच्या जीवनाची कसोटी असते. या चक्रव्यूहातून जो बाहेर पडतो त्यास पुन्हा एका दिवसांसाठी जीवनदान मिळते. आणि जो या चक्रव्यूहात अडकतो त्याचा अंत होतो. असे हे पाणवठे उन्हाळयात वन्यजीवांच्या हालचालीचा 'केंद्रबिंदू' होऊन जातात.



उत्तम शं. सावंत, भावसे
उपसंचालक, कोयना
सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कराड



ग्रे जंगलफाऊल... पण व्हाईट!

२०२४ चा जुलैचा महिना होता. मान्सून पूर्ण बहरात होता. चांदोली राष्ट्रीय उद्यान तर पश्चिम घाटाच्या मुख्य रांगेत आहे. त्या ठिकाणी तर पावसाचा जोर इतका असतो की, पाऊस थोडीही उसंत देत नाही. पाऊस इतका संततधारेने ओतत असतो की, वाटतं, आकाशातील ढग कसलातरी राग काढत आहेत. सर्व परिसराला जणू झोडपूनच काढतो. आज दिनांक १४, रविवार होता. जिल्हाधिकारी सांगली, श्री. दयानिधी सर आज चांदोलीला येणार होते. मलाही जंगलात जाऊन खूप दिवस झाले होते. जिल्हाधिकारी यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करायची होती. या उद्देशाने मी चांदोलीला गेलो. एवढा तुफान पाऊस होता की, कोणताही प्राणी दिसणं शक्य नव्हतं. फक्त चिंब भिजून अंगाशी घट्ट पिसं पकडून पावसातून इकडे – तिकडे फिरणारे मोर आणि रानकोंबडया जागोजागी दिसत होत्या. सर्व नाले – ओढे पावसाच्या गढूळ पाण्याने जागा मिळेल तिथून सैरावैरा वाहत होते. धोधो पडणाऱ्या पावसाचा रिप–रिप, आवाज आणि खळाळणाऱ्या नाल्या– ओढयाच्या प्रचंड खळखळाटाचा आवाज आसमंतात सर्वत्र भरुन होता. गच्च घनदाट अंधारुन आलेल्या जंगलातून खळखळाट करत येणारे नाले – ओढे पाहून वातावरण अतिशय रहस्यमय वाटत होते. आमचे वाहन पाणी, चिखल, नाल्यातून कसरत करीत पुढे पुढे जात होते.



इतक्यात झोळंबीच्या पुढे टाकळे कुटीच्या वाटेवर अचानक एक पांढरा शुभ्र कोंबडा दिसला. माझ्या मनात पहिलं आलं की जवळपास कुठंतरी गाव असावं आणि तो कोंबडा गावातील पाळीव असावा. जंगलात पांढरा कोंबडा असा प्रकार असण्याचे कारण नाही. परंतु या ठिकाणापासून कित्येक किमी कोणतही गावं नव्हतं. कोंबडयाचा आकार व रचनाही राखाडी जंगली कोंबडयासारखीच होती. कॅमेरा हातात होता पण फोटो काढेपर्यंत तो गाडीच्या आवाजाने जंगलात पळाला. मग टाकळे कुटीचा वनरक्षक सुनील कुरी सोबत होता. तो सांगू लागला, ''साहेब, मी याला ३–४ वेळा पाहिलं आहे. तो याच परिसरात असतो. मी व्हीडीओ व फोटो पण काढला आहे. पण तो स्पष्ट दिसत नाही.'' मी व कुरी मग भरपावसात खाली उतरुन कॅमेरा घेऊन कोंबडा गेलेल्या ठिकाणी जंगलात घुसलो. पण तो काही दिसला नाही. आणि फोटो काढण्याचा दुर्मिळ योग चुकला. फोटोवीना कोणी विश्वास ठेवत नाही. म्हणून फोटोचा प्रयत्न केला. पण फोटो मिळाला नाही. जंगलात असे बऱ्याचदा दुर्मिळ योग येतात. रोज नित्य–नियमित नवेनवे अनुभव येत असतात. म्हणून त्याच त्याच जंगलात फिरलो तरी कधी जंगल जुनं वाटत नाही किंवा अशा जंगलात फिरण्याचा कधी कंटाळा येत नाही. जंगलात अनेक गुपितं लपलेली असतात. आणि तुम्ही जेवढं वारंवार जंगलात जाता, जेवढा वेळ घालवता, तेवढी जास्त गुपितं जंगल तुमच्यासमोर उघडतं. त्यासाठी तासन तास जंगलातील रानवाटा तुडवण्याची उर्मी नेहमी जिवंत ठेवावी लागते.

उत्तम शं. सावंत, भावसे
उपसंचालक, कोयना
सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कराड

कोयना पर्यटन

सह्याद्री छाताडावर, वनराईचा साज वसे,
वनराईच्या कुशीतून, ओझर्डा हा उठून दिसे,
खळखळ वाहत तुषार उडवीत, माथ्यावरुन पडत असे,
माथ्यावरुनी पडताना खाली, लांबून दूधाची धार भासे,
पाऊस वाढताच त्याच धारेची, तीन धार होतात कसे ?

हाच क्षण पाहण्यास, पर्यटक कोसोदूरहून येत असे,
जंगली जयगड किल्ला आमचा, सह्याद्रीची शान जसे,
या किल्ल्याच्या कडांवरुनी, पश्चिमेस सारा कोकण दिसे,
याच ठिकाणी संध्याकाळी, रानगव्यांचा ही कळप दिसे,
कोकणचे नयनरम्य दृश्य पाहून, डोळयांचे पारणे फिटे,

भव्य शिळेला बाण मारुनी, रामाने इतिहास घडविला,
तहानलेल्या सिता मातेसाठी, शिळेलाही पाझर फोडला,
कितीही काढा पाणी त्यातून, वर्षभरही निघत असे,
हिच शिळा पाहण्यास लोकांना, उभारण्यास जागा नसे,
भव्य शिळा ती पावन झाली, रामाच्या त्या बाणाने,
रामबाण म्हणून ओळखू लागली, रामाच्या आशिर्वादाने,

भैरवगड अन् प्रचितगड, सह्याद्रीचे दोन अनमोल रतन,
जंगल सफारीतून फिरुन सारे, बहरुन जाते तृप्त मन,
त्याहून सुंदर ती कोयनामाई, शिवसागर पोटात घेई,
धरणाचे ते विशाल रुप, पाहूनी तन मन धन्य होई,
नेहरु बागेची सुंदरता न्यारी, विविध फुलांचे दर्शन देई,
कोयनेची गाथा ऐकूनी, वैज्ञानिक दुरदृष्टीची कल्पना येई.



संजय रणधीर
वनपाल,
रासाटी, वनपरिक्षेत्र कोयना

गोष्ट एका रानमित्राची

माझा आज मुक्काम होता वेळे नियतक्षेत्रातील कुटीवर! माझे नियतक्षेत्र. पाटण वन्यजीव परिक्षेत्रातील कोयना जलाशयाच्या पूर्वेचा भाग. सातारा – ठोसेघर – सज्जनगड पासून पुढे १६ कि.मी. गेलं की चाळकेवाडीचं पठार येते. पवनचक्क्यांच्या जगात आल्यासारखं वाटतं, इतक्या पवणचक्क्या आहेत. या सडयावरच माझी संरक्षण कुटी आहे. दोन मजुरांसोबत इथं २४ x ७ राहून आम्ही सकाळ संध्याकाळ आमच्या नियतक्षेत्रात पायवाटेत गस्ती करीत असतो. आज संरक्षण कुटीवरच मुक्कामी होतो. रात्रीचं जेवण झालं होतं. थंडीचे दिवस होते. शेकोटी करून मी मजूरांसोबत गप्पा मारत बसलो होतो.



मी असे ऐकले होते की, आगीजवळ कोणताही वन्यप्राणी येत नाही. परंतु घडले उलटेच. आम्हाला काही अंतरावर जवळच काहीतरी असल्याचे जाणवले. कोणता तरी वन्यप्राणी आहे हे नक्की होतं. आम्ही सर्व घाबरलो. वन्यप्राणी जवळ यायच्या आतच आम्ही कुटी गाठली आणि दरवाजा बंद करून घेतला. सकाळ झाली आणि नेहमीप्रमाणे नियतक्षेत्रातील कामकाज चालू झाले. परंतु, दिवसभर माझ्या मनात कालच्या रात्रीचा एकच विषय घोंगावत होता. पुन्हा दुसऱ्या दिवशीची रात्र आली. आज तो वन्यप्राणी येतो की नाही याची उत्सुकता वाढली होती. आज मात्र शेकोटी, कुटीच्या शेजारीच केली म्हणजे वन्यप्राणी आलाच तर तो लाईटच्या प्रकाशात स्पष्ट दिसावा. रात्री ११.०० वाजले तरीही, तो काही आला नाही. अजून अर्धातास वाट पाहायचे ठरवले. त्याप्रमाणे तो वन्यप्राणी अचानक कुटीच्या गेटवर आला. त्याला आम्ही लांबूनच पाहत होतो. ते तर खोकड (Indian Fox) होते. मुळातच तो भित्रा प्राणी असून तो माणसाजवळ येईल कसा? मी चालत त्याच्या जवळ गेलो की, तो थोडे दूरवर जायचा. मी त्याला एका भांडयामध्ये पाणी ठेवले आणि दूर झालो. त्याने भांडयातील पाणी पिले आणि तो तेथून निघून गेला. बॅटरीच्या प्रकाशात त्याला पाहिले असता, तो पुढे चालता चालता सतत मागे वळून पाहत होता.

पुन्हा पुढील रात्री तो येतो की नाही याची उत्सुकता होतीच. शेकोटी करून आम्ही त्या वन्यप्राण्याची वाट पाहू लागलो. जणू आम्हाला त्याची सवयच झाली होती. नेहमीप्रमाणे तोही आला. आज मात्र ठरवले आपण त्याच्या जवळ जायचे नाही. तो किती आपल्या जवळ येतो हे पाहू. म्हणून मी मांडी घालून कुटीच्या समोरच बसलो आणि तो हळूहळू माझ्या दिशेने यायला लागला. मला भिती वाटायला लागली. तरीही मी तेथेच बसून राहिलो. काही वेळाने तो माझ्या अगदी समोरच येवून बसला. आता यापुढे काय करावे काहीच समजेना. नंतर त्याने जवळ येवून माझा गुडघा व मांडी जवळचा वास घेवू लागला. तरीही मी स्तब्धच होतो; नंतर तो माझा हात चाटायला लागला. त्याच्या जिभेचा स्पर्श हाताला होताच माझ्या अंगावर शहारे उभे राहिले. एवढे झाल्यानंतर मला याच्यापासून कोणत्याही प्रकारचा धोका नाही, याची पूर्णपणे खात्री झाली. मी त्याला भांडयामध्ये पाणी ठेवले. ते त्याने पिले. आता मात्र आमच्या दोघांची मैत्री झाली असे वाटायला लागले होते. कारण तो मला भित नव्हता आणि मी त्याला भित नव्हतो. एकवेळा मी त्याचे वास्तव्य शोधण्यासाठी त्याचा मागोवा घेतला. सुमारे अडीच तीन कि.मी. च्या भटकंती नंतर तो कोठे गेला याचा काही शोध लागला नाही. त्याचे वास्तव्य सापडले नाही तेही बरेच झाले. जर त्याचे वास्तव्य सापडले असते तर ते ठिकाण पाहण्यासाठी सतत कोणी ना कोणी प्रयत्न केला असता. आणि त्याने त्याचा नैसर्गिक अधिवास बदलला असता. वन्यप्राणी पशु–पक्षी हे निसर्गातच मुक्त संचार करताना छान वाटतात.

त्या वन्यप्राण्यांच्या रोजच्या येण्याने त्याचे आणि माझे मैत्रीचे संबंध घट्ट झाले. अजूनही त्याची ये–जा कुटीवर रात्रीच्या वेळी चालूच असते. वनसेवा करीत असताना असे प्रसंग घडल्यानंतर काम करताना मनात नवचैतन्य निर्माण होते. आता मात्र हा वन्यप्राणी कोणत्याही प्रकारची भिती मनात न बाळगता कुटी भोवती रोजच बागडू लागला होता. जणू काही त्याला माहितच झाले की, ही वनविभागाची माणसे आहेत आणि यांच्यापासून आपणाला कोणत्याही प्रकारचा धोका नाही. अशी घटना माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच घडली होती. आता या माझ्या मित्राची संरक्षणाची पूर्ण जबाबदारी मी माझ्या खांदयावर घेतलेली आहे. दिवसभर कामाने थकलेलो असताना, जेव्हा सायंकाळी माझ्या वन्यप्राणी मित्राला मी पाहतो, तेव्हा थकवा आपोआपच निघून जातो. मी जोपर्यंत त्या ठिकाणी कार्यरत आहे तोपर्यंत माझी आणि त्याची मैत्री कायम राहणार हे नक्की.

अरण्यातूनी आवाज येई कोल्हेकुईचा,
साद घालूनी बोलावून घेवू त्या वन्यप्राण्यांला ।
हे स्वप्न सत्यात उतरेल, ना याची कल्पना कोणाला,
निर्भिड कोल्हा येवून बसे, सहयाद्रीच्या आवाराला ।
कसे समजले जणू त्याला, आम्ही आहोत त्याच्या संरक्षणाला,
घट्ट झाली मैत्री आमुची, ना भेदणे आता शक्य कोणाला ।



दि.भा.सोरट
वनरक्षक,
देऊर, वनपरिक्षेत्र पाटण

गोष्ट एका पाणवठ्याची

मा. उपवनसंरक्षक कोल्हापूर गुरुप्रसाद साहेब व मा. वनक्षेत्रपाल तायनक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्रातील मौजे गंगापूर येथील जंगल कंपार्टमेंट नंबर ३१८ मध्ये वन्यप्राण्यांच्यासाठी कृत्रिम पाणवठे तयार करण्याची ही गोष्ट आहे.



उन्हाळ्यात तहान भागविण्यासाठी जंगलात पिण्यासाठी पाणी मिळवणं, वन्यप्राण्यांसाठी फार जिकीरीचं होऊन बसत. यावेळी जंगलातील झरे, पाणवठे सुकून जातात. आणि त्यांना पाणी मिळत नाही. मग ते वन्यप्राणी कुठेतरी नदीकाठी जाऊन २–४ किलोमीटर प्रवास करुन रात्रीच्या वेळी पाणी पिऊन यायचे किंवा एखादा पूर्ण दिवस पाण्यावाचून राहायचे. रात्र कधी होईल आणि मी पाणी पिण्यासाठी कधी जाईन अशी अवस्था वन्यप्राण्यांची झालेली असते. त्याचवेळी मा.उपवनसंरक्षकसो आणि मा. वनक्षेत्रपाल यांनी आम्हाला मानव निर्मित पाणवठे तयार करण्याचे आदेश दिले. तसे हे काम आजपर्यंत कोणी आपल्या अधिनस्त वनरक्षक किंवा वनपाल यांना सांगितलेले नव्हते. परंतू आज पाण्याचे खरं महत्व काय आहे? त्या गंगापूर मध्ये पाणवठेचे काम करते वेळी आपोआप लक्षात आलं आणि आमच्या डोळ्यामध्ये पाणी आलं कारण त्या ठिकाणी काम करत असताना, एक शेतकरी आला आणि म्हणाला आमची विहीर आहे. विहीरीतील पाणी खाली तळाला गेले आहे. रात्रीच्या वेळीस १२ ते १५ गवे त्यांच्या लहान पिल्यासहीत रात्रीचे रोज येतात. आणि या विहीराच्या सभोवतालास पाण्यासाठी गोल – गोल व्याकूळतेने फिरत असतात. तहान भरपूर लागलेली असते. परंतू, पाणी उपलब्ध नसल्यामुळे त्यांना या विहीरीपासून २ ते ३ किलोमीटर पाण्याचा शोध घेण्यासाठी जावे लागते. हे ऐकून मनास वाईट वाटले. आमच्या डोळ्यामध्ये पाणी आले. त्यामुळे वनरक्षक आंबवणे, श्री. सागले साहेब तसेच वनसेवक श्री. कोकाटे यांनी दोन दिवस उन्हातान्हात या वन्यप्राण्यांच्यासाठी कृत्रिम पाणवठा तयार केला. त्या शेतकऱ्याला आम्ही विनंती केली की, या गव्यांचे पाण्यावाचून हाल होवू नये, यासाठी तुमच्या विहीरीतून फक्त दहा मिनिट पाणी या पाणवठ्यामध्ये आपण सोडावे. आमच्या या विनंतीला मान देऊन, त्या शेतकऱ्यानी वन्यप्राण्यांची होत असलेली वनवण पाहून व पाण्यासाठी होणारी तळमळ पाहून, जोपर्यंत पाऊस पडत नाही, तोपर्यंत मी रोज पाणवठा भरून ठेवतो, असे आम्हाला आश्वासीत केले. हे ऐकून आम्ही कृतकृत्य झालो. श्री. संदीप नामदेव सावर्डेकर या शेतकऱ्याचा आजही आम्हाला अभिमान वाटतो. कारण त्यांच्या पिकांचे हे गवे रोज नुकसान करीत असताना सुध्दा हे शेतकरीबंधु वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची काळजी घेण्यास तयार झाले. हि बाब आमच्यासाठी खूपच कौतुकास्पद होती .



मारुती डवरी
वनपाल, कुर,
वनपरिक्षेत्र गारगोटी, कोल्हापूर प्रादेशिक
(सह्याद्री–काली व्याघ्रप्रकल्प भ्रमणमार्ग)

मी वाघ बोलतोय

अरे माणसा माणसा
थांबव तुझा विकास
संपली की वृक्षसंपदा
झाली जंगले भकास

मी बाहेर नाही यायचं
मला जंगलाबाहेर बंदी
पण तू कुठेही फिरायचं
माझ्या जंगलातही तू स्वच्छंदी

पूर्वी झाल्या शिकारी
माझी संख्या ही रोडावली
वन्यजीव विभागाने घेतली आता
माझी संख्या वाढवण्याची हमी

नको तू काही करु
तू फक्त नियमात रहा
माझी संख्या नक्की वाढेल
आता नुसत बघत रहा



मनिषा देसाई
वनपाल,
आंबा, वनपरिक्षेत्र आंबा

प्रचितगडाचं पहिलं दर्शन।

मार्च महिन्याचे दिवस होते. दुपारच्या सुमारास चांदोली वन्यजीव कार्यलयामध्ये मा. वनक्षेत्रपाल नंदकुमार नलवडे साहेब, वनपाल हारून गारदी, वनपाल शिवाजी पाटील (मेजर) यांचे सोबत आज रात्री रात्र गस्त करत उदया सकाळी लवकर प्रचितगड बघायचा असा अचानक बेत ठरला. कित्येक दिवस असह्य होवून सोसलेला उन्हाळा, त्यामुळे डोळे आणि मन पुरतं रखरखून गेलेलं. कित्येक दिवसापासून पावसाची जणू चातक पक्षी वाट बघतो, तशीच प्रचितगड बघण्याची वाट मी चांदोली येथे रूजू झालेपासून बघत होतो. सायंकाळी ५ वाजण्याचे सुमारास रात्र गस्त करण्याच्या हेतूने निघालेली गाडी निवळे संरक्षण कुटी – सोनार्ली फाटा – ढाकळे संरक्षण कुटी – गोठणे फाटा असा प्रवास करत रात्री १०.३० च्या सुमारास चांदेल संरक्षण कुटी येथे मुक्कामी पोहोचलो. रात्री उशीराच डाळ – भात खातानाच, उदया पहाटेच ६.३० पूर्वीच चांदेल सोडून पुढे निघण्याचा निर्णय झाला. ठरल्याप्रमाणेच सकाळी चांदेल वनरक्षक ज्ञानेश्वर काळे यांना सोबत घेवून आम्ही ६ लोकांनी प्रचिगडाची वाट धरली. चांदेल पासून पुढील जंगल एकदम घनदाट होतं. गाडीतून जंगल पाहात वाटेत येणाऱ्या राम नदीमध्ये हातपाय धुतले व पिण्यासाठी पाण्याच्या बाटल्या भरून घेतल्या. पुढे सिद्धेश्वर नियतक्षेत्रातील कलावंतीण विहीर पाहिली. दोन्ही बाजूस घनदाट जंगलामधून जाताना वाटेत उभी असलेली ती राम लक्ष्मण नावाने ओळखली जाणारी पातीची झाडे पाहिली व पुढे निघालो. प्रचितगड जवळ आला आहे अशी चर्चा रंगत असताना गाडी इथेच उभा करून पुढील प्रवास पायी करण्याचे ठरविले.

समोर दिसणारा गड मन आकर्षूण घेत होताच, पण मधे असलेली तीव्र उताराची दरड पार करून जावे लागणार ही मनातील भिती मात्र लपवता येत नव्हती. एकमेकांना हाताने आधार देत ती तीव्र उताराची दरड पार करून बरीच चढण चढल्यानंतर मुख्य आवाहन होते ते म्हणजे दुसरा टप्पा असलेली तुटलेली लोखंडी शिडी चढून गडावर जायचे. आपण चढताना मध्येच शिडी तुटली तर, अथवा आपला पाय घसरला तर, काय होईल? याचा विचार करत थोडा वेळ थांबल्यानंतर शेवटी काहीही झाले तरी गडावर जायचे हा निर्णय पक्का करून शिडी चढू लागलो. वनपाल शिवाजी पाटील (मेजर) सर्वात आधी शिडी चढून हाताने सर्वांना वर घेवू लागले. सुमारे पाऊण तास चढ–उतार असा प्रवास करत घामाचे थेंब रूमालाने पुसत आम्ही गडावर पोहोचलो होतो. समोर दिसणारा तो सह्याद्रीचा कडा, त्यावरील काळे पाषाण, हिरवीगार घनदाट झाडी, जोराचा वाहणारा वारा हे बघताना इतक्या दिवस रखरखलेले डोळे नेमके हीच दृश्ये बघण्यासाठीच हाटून बसले असावे असा भास झाला.

गडावर गेल्यावर एक प्राचीन भवानी मातेचे मंदीर लागते. देवी मातेला तिथेच एका पेपरच्या पुडीत ठेवलेले हळदी – कुंकू लावून आम्ही हात जोडले. तसेच, तिथल्या प्राचीन तोफांना हात लावून पुढे चालत असताना गडावरील प्रसिद्ध बारमाही पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बघण्यासाठी सर्वजण आवर्जून त्या ठिकाणी गेलो. पाषाणात कोरलेल्या त्या चौकोनी आकाराच्या ३–४ पाण्याच्या टाक्या खरचं एक अद्भूत कलाकृती आहे. त्यामधील पाणी एकदम स्वच्छ म्हणजे त्या पाण्याच्या तळात टाकलेली एक व दोन रूपयांची नाणी सुद्धा वरून पाहिल्यावर स्पष्ट दिसत होती. आम्ही सोबत आणलेले पिण्याचे पाणी जवळ जवळ संपत आले होते. त्यामुळे एका कुंडातील पाणी बाटलीने भरून आम्ही सर्वजण पाणी पिलो.

इतक्या वर्षापासून असलेल्या एका मोठया उंबराच्या झाडाखाली २०–२५ मिनिटे आराम केला. आणि उत्साह, उर्मी व शिवरायांचा अभिमान मनात भरून गडावरून परतलो.









गजानन सकट
वनरक्षक, ढाकाळे



NEWS OF SAHYADRI TIGER RESERVE

epaper.mahamtb.com

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प वाघांसाठी सज्ज..

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात नुकतेच वाघाचे दर्शन घडले. व्याघ्र प्रकल्प असूनही वाघ नाही यामुळे अनेकदा याविषयी नकारात्मक प्रतिक्रियाच अधिक उमटताना दिसतात. याच पार्श्वभूमीवर सह्याद्रीतल्या वाघांवर या व्याघ्र प्रकल्पाच्या १४व्या वर्धापन दिनानिमित्त प्रकल्पाचे उपसंचालक आणि उपवनसंरक्षक उत्तम सावंत यांची ही मुलाखत...

मुलाखत समृद्धी ढमाले

■ सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघ नाही, अशी टीका नेहमी केली जाते, अशा परिस्थितीत 'एनटीसीए' (National tiger conservation authority) कडून प्रकल्पात 'व्हेरी गूड कॅटेगिरी'चा दर्जा मिळण्याची किमया कशी साधली?

सह्याद्रीमध्ये मुळात पहिल्यापासूनच वाघांचा अधिवास होता. अगदी २०१४ पर्यंत सह्याद्रीतील कॅमेरा ट्रॅप्समध्ये वाघांचे ... दर्शन घडत होते. परंतु, नंतर अनेक कारणांमुळे ... परिणामस्वरूप म्हणून ... प्रकल्प सुरू होता. प्रकल्पात अधिवास असण्यासाठी ... केले जात असून अशा पद्धतीचेच 'प्रे-अगिमेंटेशन' प्रकल्प चालू आहे. या व्यतिरिक्त काऊज, ताळीका, ... त्यांची या परिसरामध्ये टिकून राहण्याची ... अधिक वाढते. यासाठी व्यवस्थित तयारी केली असून वाघांच्या स्थानांतरणावर विविध ठि... जाऊन अभ्यासही करण्यात आला आहे. 'डब्ल्यूआयआय'चे सहाशहर म्हणून सहे आणि ही घेतली जात आहे.

■ नुकतेच प्रकल्पात वाघाचे दर्शन झाले. त्यासाठीचे नियोजन कशा पद्धतीने होत आहे?

सध्या राधानगरी ते तिलारी क्षेत्रात असलेले वाघांपैकी हे वाघ असावेत असे म्हटले जाते. त्याचबरोबर, कर्नाटकजवळ असलेल्या वनक्षेत्रातून ही येण्याची शक्यता होती. मात्र, ... वाघांचे, त्यांच्या ... असलेल्या ... अधिवासाचा ... एक मोठी समस्या ... वाढविण्यासाठी ...

epaper.mahamtb.com

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात घुमली वाघाची डरकाळी

५ वर्षांनंतर वाघाचे दर्शन; 'कॅमेरा ट्रॅप'मध्ये छायाचित्र कैद

अक्षय मांडवकर ■ मुंबई, दि. २१ :

'सह्याद्री व्याघ्र प्रकल्प'मध्ये पुन्हा एकदा वाघाची डरकाळी घुमली आहे. व्याघ्र प्रकल्पामधील 'चांदोली राष्ट्रीय उद्यान'मध्ये पहिले वाघाचे दर्शन घडले आहे. छायाचित्रित झालेला वाघ हा नर जातीचा असल्याचा अंदाज आहे. या वाघाच्या वावरामुळे 'सह्याद्री व्याघ्र ...

Camera trap captures tiger in Sahyadri reserve

Forest officials set up the camera traps near forest trails and water bodies after a labourer noticed pug marks of a big cat on December 12; officials say the development comes as a boost to the Tiger Recovery Programme

RANJEET JADHAV

Vidarbha's tigers to roar in Western Maharashtra's Sahyadri Reserve soon

Forest department to shift a tiger couple from TATR; to be released in the wild later

RAKESH MARULKAR
NAGPUR

The Sahyadri Tiger Reserve in Western Maharashtra, where the roar of any big cat was last heard several years ago, will soon have two tigers gifted to it by the Tadoba-Andhari Tiger Reserve of Chandrapur district.

Forest officials have identified one male and a female tiger in the buffer zone of the tiger reserve for reintroduction purposes. The officials will 'soft release' the pair at Sahyadri in an enclosure for some time after which they will be released in the wild.

A memorandum of understanding will be inked by the department with the Wildlife Institute of India (WII), Dehradun paving the way for reintroduction of the apex predator in the Sahyadri Reserve. The shifting of the animals will be done under technical guidance of scien-

Translocation of 5 tigers to NNTR in process

The Forest Department has also undertaken operations to translocate tigers from Brahmapuri and Chandrapur landscape to Navegaon-Nagzira Tiger Reserve (NNTR) in Gondia district. It translocated two tigresses from Chandrapur and Gadchiroli districts to NNTR on May 20, 2023 and one tigress from Chandrapur district on April 11, 2024. It has planned to shift two more tigresses there to complete the target of five big cats to improve the skewed ratio of tigers, Gupta said.

inspected basic facilities, including availability of water and habitat improvement, required for the big cats there.

gradually got fragmented thereby restricting the movement of the carnivores. One transient tiger was captured

Tigers could earlier Sawantwadi, Mah was a clear tiger c

tist Ramesh of WI

The same scient strumental in the tigers in Puna Tip of Madhya Prade too was benefi of 1

In 2008. Now, reserve boasts of h 100 big cats.

This was disclo principal chief co of forest (wildli rashtra, Maheep Gu

महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

समृद्ध सांगली

२१ वा वर्धापनदिन विशेषांक

पुण्य सांगली, गुरु

सह्याद्री प्रकल्पात पट्टेरी 'टी-१' वाघ मुक्कामाला!

पहिलाच वाघ : वन्यजीव विभागाने दिली विशेष ओळख

संजय पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

कडूस (जि. सातारा) : सह्याद्रीत वाघांचे अस्तित्व वारंवार अधोरेखित झाले आहे. मात्र, एका पट्टेरी वाघाने प्रकल्पात मुक्तसंचार दीर्घकाळ, म्हणजे महिनाभरहून जास्त कालावधीपासून तो येथे मुक्कामी वास्तव्यास, तिथल्याकानच्या कॅमेरा ट्रॅपमध्ये तो कैदही झाला आहे. त्यामुळेच दीर्घ कालावधीपासून वास्तव्याला असलेला हा पहिलाच वाघ असल्याचेही वन्यजीव विभागाने म्हटले आहे. 'टी-१' असे वेगळी ओळख दिली आहे.

पहिलाच वाघ; पहिलेच 'मार्किंग'

सह्याद्री प्रकल्पात आढलेल्या रिह्ह संततीत तब्बल तीनचा तपासणी वेगवेगळ्या रेहतापाच्या भारतीय वन्यजीव संस्थेने येथे सात वाघांचा वावर असल्याचे

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प... जिल्ह्याचे वैभव

Sahyadri tiger reserve to hear roar of big cats again

Vijay.Pinjarkar@timesgroup.com

NTCA gives nod to shift 8 tigers from Chandrapur to STR

Nagpur: With the National Tiger Conservation Authority (NTCA) giving the go-ahead to reintroduce eight tigers into Sahyadri Tiger Reserve (STR), the forest left with zero tigers will soon hear the big cat roar again.

The NTCA Status of Tigers-2022 report said the tiger ... through which 17,400 trap ... efforts were made, but the end result was zero tigers.

According to Principal chief conservator of forest (PCCF) for wildlife Maheep Gupta, 8 tigers captured from Chandrapur landscape will ...

27 villages relocated, plans afoot to reintroduce deer in Sahyadri

Continued from P 1

Though there are no tigers in Sahyadri, the fifth cycle of NTCA's final Management Effective Evaluation (MEE)-2023 report released in July has rated the tiger reserve as 'very good' with 78.79% other positi for tigers.

WAITING TO ROAR

- Sahyadri Tiger Reserve in southeastern part of Maharashtra, covering Ratnagiri and Kolhapur districts
- STR does not have known

gers we have voluntarily relocated 27 villages, and work to rehabilitate the remaining 8 villages is in progress," said Gupta.

In Phase II, Gupta said landscape-level study of the vital corridor (Sahyadri-Dandeli) and interstate landscape management

चांदोली उद्यानाला ३४४० पर्यटकांची भेट

लुटला पर्यटनाचा आनंद : निसर्गप्रेमींनी पाऊलवाटांचा अनुभवला थरार

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पौर्णिमेच्या रात्री निसर्गप्रेमींनी अनुभवला अरण्यथरार

महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

कराड, दि. २६ मे : सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडून बुद्ध पौर्णिमेनिमित्त येणाऱ्या आलेल्या निसर्गपुनम कार्यक्रम २०२४ अंतर्गत पार पडलेल्या मचाणावरील वन्य प्राणी गणनेत निसर्गप्रेमींना २७० हून अधिक वन्यप्राण्यांचे दर्शन घडले आहे. बुद्ध पौर्णिमेला म्हणजे २३ मे रात निसर्गपुनम कार्यक्रम २०२४ निमित्त निवडक ८१ निसर्गप्रेमींना सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील पाटण, कोयना, वामणोली, कांदाट, चांदोली, देवेवाडी, हेळवाक आणि आंबा या वन परिक्षेत्रातील जंगलातील ८१ मचानवर बसून अरण्यवाचनाचा थरारक अनुभव घेण्याची संधी मिळाली. कुशाग्र वातावरण, दाट पुके व पाऊस अधूनमधून अनुभवा अनुभवा प्रकाशात पार पडलेल्या या गणनेत ... पायथोरेच्या नगर, पुणे, मुंबई येथून निसर्गप्रेमींनी हजेरी लावली होती. निसर्गप्रेमींकडून भरून घेण्यात आलेल्या अभिप्रायांनुसार गणनेसाठी सहभागी झालेल्या निसर्गप्रेमींनी निसर्गानुभव कार्यक्रम व त्याकरीता दिलेल्या सोयसुविधांबाबत संतुष्टता व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे सर्व मचाणीवर वन्यप्राण्यांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दर्शन घडले आहे. मचाणावर निसर्गप्रेमींना गणनेची माहिती घेण्याकरीता प्रश्न देण्यात आले होते. याबरोबर जंगी राहुल पानवठ्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या प्राण्यांची नोंद निसर्गप्रेमीकडून करण्यात आली. सदर नोंदीनुसार त्यांना ८१ मचाणींवर दोनशेहून अधिक वन्यप्राण्यांचे दर्शन घडले आहे. निसर्गानुभव कार्यक्रमासाठी उपस्थित प्रगणकांना व्याघ्र प्रकल्पाचे मार्गदर्शनाखाली प्रकल्पातील आठ वनक्षेत्रपाल यांनी परिश्रम घेतले.

दिनांक ०५ जानेवारी २०१० रोजी सह्याद्री व्याघ्र प्रकल्प अस्तित्वात आला आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ हे १२४५.५७ चौ. किमी. आहे. व्याघ्र प्रकल्प हा सातारा, सांगली, कोल्हापूर आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यात येतो. पश्चिम महाराष्ट्रात सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा एकमेव आहे. पेरिपत जंगल हे सह्याद्रीतील उर्वरीत पन्नास व वानरवा प्रेमीतील सिद्धक राहिलेले जंगल आहे. पश्चिम महाराष्ट्रात समृद्ध कन्याच्या कोयना व वारणा जलाशयाचे गाळाने भरण्यापासून संरक्षण हे जंगल करीत आहे.

रानकुत्रा कृती आराखडा बैठक ठरली फलदायी

दै. 'मुंबई तरुण भारत' आणि 'विवेक पार्क फाऊंडेशन'कडून आयोजन; संशोधक, वनाधिकारी, ग्रामस्थांची एकजूट

संरक्षण कुटीद्वारे जंगलातील गैरप्रकारांवर लक्ष

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात उपक्रम; शिकार, वृक्षतोडीवर येणार नियंत्रण

सातारा : पुढारी वृत्तसेवा

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या पाटण (वन्यजीव) परिक्षेत्रातील खुडुपलेवाडी येथील नवीन संरक्षण कुटीचे उद्घाटन करण्यात आले. जंगलात वणवे लावणे या वन्यकुटीद्वारे वन्यप्राण्यांची शिकार, वृक्षतोड यावर लक्ष ठेवून नियंत्रण आणण्यात येणार आहे. पाठसणी कोल्हापूर वनपुनाचे मुख्य वनसंरक्षक तथा सह्याद्री व्याघ्र ...

"संरक्षण कुटीचा उपक्रम कौतुकास्पद आहे. परिसरात रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. या निरीक्षण कुटीमुळे शिकारीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि वन्यजीव संरक्षणासाठी मोठा हातभार लागेल.

- मणिकंदा रामानुजम,

उद्घाटनप्रसंगी मणिकंदा रामानुजम, समवेत उत्तम सावंत व वनाधिकारी.

संरक्षण कुटीमुळे शिकारीवर नियंत्रण व वन्यजीव संरक्षणासाठी हातभार लागणार : रामानुजम

पाटण, दि. २४ : सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या पाटण (वन्यजीव) परिक्षेत्रातील खुडुपलेवाडी येथील नवीन निसर्गास संरक्षण कुटीचे उद्घाटन आज ... वन्यजीव ... शिकारीवर नियंत्रण आणणे हेच आहे. नवीन कुटीमुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. त्यामुळेच शिकारीवर ... सर्वांनी एकत्रित येण्याचे आवाहन रामानुजम यांनी केले.

नुनावळेत हातपंपामुळे पाणीप्रश्न मार्गी

ोटर बसविल्याने गावातील पाणी टंचाईवर झाली मात

लोकशाही मजबुतीकरणासाठी मतदानाचा अनोखा संदेश

कोयना धरण, वन्य जीव व वन संवर्धनाचा संदेश देणारी युनिक मतदान केंद्रे

विजय लाड

मानवाने जंगलातील हस्तक्षेप कमी केल्यास बिबट्या मानव वस्तीत येणार नाही

ढेबेवाडी/सागर पाटील (दै. महाभारत)

येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प व वनपरिक्षेत्र

सर्प दिनानिमित्त ढेबेवाडी खोऱ्यात जनजागृती

सह्याद्री व्याघ्रचा उपक्रम; सापांविषयीची भीती, गैरसमज होणार दूर

सर्पदिनानिमित्त सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामार्फत जागृती

ढेबेवाडी येथील वन्यजीव विभागाचा उपक्रम : शाळांमधून विद्यार्थ्यांशी साधला संवाद

व्याघ्र प्रकल्पातील गावे स्वयंपूर्ण बनविणार

वनपरिक्षेत्र अधिकारी विजय बाठे; बामणोली वनपरिक्षेत्रातील अंबवडे येथे साहित्य वाटप

'चांदोली'तील पाथरपुंजमध्ये सर्वाधिक पाऊस

चेरापुंजीलाही टाकले मागे; जोरदार पर्जन्यवृष्टी

मानव अन् वन्यजीव संघर्षाबाबत जनजागृती

युवकांचे प्राथमिक दल स्थापन : भोसगावला निसर्ग पर्यटन संकुलात कार्यशाळा

VARIOUS AWARENESS PROGRAMS



Nature trail at Koyna Range with students from Art and Science College, Koynanagar.



14th Foundation Day Awareness Program at Junior College, Dhebewadi



Nature Education Tour at Patan Range for the National Harit Sena Students in collaboration with Social Forestry, Satara.



Nature Education Tour at Bhedbewadi Range for the National Harit Sena Students in collaboration with Social Forestry, Satara.



Nature walk at Koyna range with Shardabai Pawar College, Jakatwadi, Satara.



Nature Education Tour at Koyna Range for the National Harit Sena Students in collaboration with Social Forestry, Satara.



International Tiger Day awareness program at Shrimant. Dadasaheb Patankar Highschool, Mhavshi



International Tiger Day Painting contest at Maral School, Patan Range

OFFICERS FIELD VISITS





Visit of Mr. Shailesh Tembhurnikar, PCCF Hoff. Maharashtra at Divisional Office, Satara



Field visit at Bamnoli Kandat with Shekhar Singh, Muncipal Commissioner PCMC, Pune



Field visit with Collector of Sangli District- Mr. Raja Dayanidhi (I.A.S) at Chandoli division of STR.



Field visit of MP-Pench Tiger Reserve Officials at Bamnoli Range Office, Bamnoli.



Welcoming MP-Pench Tiger Reserve Officials at Deputy Director, Koyna Office, Karad.



Field visit of MP-Pench Tiger Reserve Officials at Chandoli Range with Deputy Director, Chandoli.



Visit of Retired PCCF, (Wildlife) Mr. Nakvi Sir at DD, STR, Office Karad



STR-T1 Tiger tracking with Security Audit Authorities at Chandoli Range.



Field visit with Security Audit Authorities and DD, Koyna at Bamnoli-Kandat range protection camps.



3 days MSTrIPES Training of Trainee RFO Batch at Sagareshwar wildlife sanctuary by Tiger Cell.



Checking of newly constructed field road in Amba range with DD, Koyna and DD, Chandoli.





Study tour visit of Trainee RFO Batch from Telangana Training Academy at DD, Koyna office.





Field visit and forest trek with CCF, CF & Field Director at Koyna Range.

STAKEHOLDERS ENGAGEMENT



Welcoming actor Mr. Sayaji Shinde,
Devrai Foundation team and CCF, CF & FD, STR.



Welcoming actor Mr. Sayaji Shinde,
Devrai Foundation team and CCF, CF & FD, STR.



Donation of Trunks for protection camps
from Devrai Foundation.

VILLAGE ECO DEVELOPMENT COMITY



Various benefits sharing with VEDC members
at Patan range.



Group discussion with VEDC Members in Patan Range.





IDBI Bank Rural Development program at Kandat and Bamnoli range.

VARIOUS OTHER PROGRAMS



Inauguration of "STR Gaurav Geet" at 14th Foundation Day of STR at Kundal Training Academy.



Felicitation of stakeholders at 14th Foundation Day of STR at Kundal Training Academy.



STR Officials at 14th Foundation Day of STR, Kundal Training Academy.



Republic day-26th January, 2024 celebration at Deputy Director, Koyna Office.





"Forest Conservation and Late. Chatrapati. Shahu Maharaj- Group discussion workshop" at Amba in collaboration with Malkapur range office and Amba Range Office.



Inauguration of One day workshop" at Amba in collaboration with Malkapur range office and Amba Range Office.



Kolhapur Circle Forest Officers Conference,



Certificate distribution to participants in Nisarga Anubhav Program at Amba Range Office, Amba



T-shirt distribution to participants in Nisarga Anubhav Program at Amba Range Office, Amba



STR wildlife Conservation messengers Voting booth, Rasati during the Lok Sabha Election, 2024.



DD, Koyna participated in Dhole Conservation Conference, Devrukh.





Capacity building for modified wildlife protection act Workshop WCT Mumbai





Mother quilt training workshop for VEDC women empowerment at Koyna range.

PHASE - I & PHASE- IV MONITORING AND TIGER RECOVERY PROJECT



Phase-I MSTrIPE Ecological App Training at Dhebewadi Range Office



Phase-IV Camera Trapping 2024



Phase-IV Camera Trapping 2024



Phase-IV Camera Trapping 2024



Prepared fully equipped Wildlife Transportation Van for Tiger Translocation project.



RRT Team giving presentation after returning from 7 days on field training with RRTA, STPF and VHF teams of Navegaon Nagzira Tiger Reserve.



24*7 Camera Trap monitoring of STR-T1 male in STR.



Construction of Tiger Enclosure at Chandoli division for the Tiger translocation project.

KOLHAPUR CIRCLE ANNUAL SPORTS HOSTED BY STR



Inaugural parade at Kolhapur Circle Annual Sports 2024 hosted by STR.



STR sports players participated in Kolhapur Circle Annual Sports 2024



Felicitation of CCF, Kolhapur during the Kolhapur Circle Annual Sports 2024 hosted by STR at Kundal Academy.



Drone view of final Kabbaddi Match, Kolhapur Circle Annual Sports 2024




Women final 400 m run competition.



Men's Final 400 m run competition.



Certificate distribution to the Winners by CCF Kilhapur.



Live Final Score Board of Kolhapur Circle Annual Sports 2024- Winner- Kolhapur Territorial Division.

MEDICAL CAMP





1.Medical Camp at Helwak in collaboration with Krishna Hospital, Karad



Medical Camp at Kandat in collaboration with Mandeshi Foundation, Mhaswad



Medical Camp at Koynanagar in collaboration with Krishna Hospital, Karad

STAFF WELFARE



Donated Carvan Music station to all protection camps in STR.



Celebrating the retirement of field staff member Mr. Aadsule at DD, Koyna office.



Field dress and shoes given to all field staff members, Patan range, Koyna division.



Rain wear given to all field staff members, Patan range, Koyna division.



Sleeping bags given to all protection camps in STR.



Gifting Carvan Music Station with the hands of CF & FD, STR at Koyna.

NEW GUARD TRAINING



Deputy Director, Koyna having interaction session with newly joined forest guards on inaugural day of Three days Training workshop at Kundal Training Academy.



RFO, Sagareshwar giving overview of Sagareshwar Wildlife Sanctuary.



RFO, Dhebewadi giving talk on human wildlife conflict and compensation method.



RFO, Dhebewadi giving talk on human wildlife conflict and compensation method.





Concluding session of the Three days residential work for newly joined forest guards.

CONSERVATION EMPOWERMENT



Inauguration of Cyber Cell by CCF, Kolhapur at CF & FD Office, STR, Kolhapur



Inauguration of Tiger Cell at DD, STR, Karad Office by Actor Sayaji Shinde.



New Tiger Cell at DD, STR, Karad Office.



New Mobile-PDAs given to all field staff members with the funding support from NTCA and STR Foundation.



New 150 Camera Traps purchased to build the capacity of Tiger reserve for monitoring of wildlife and effective protection of habitat.



75 Carvan Music Stations donated by well wisher of STR for each protection camps in STR as a relaxing instrument.



Sleeping bags given to all protection camps in STR through CSR support.



Newly constructed protection naka, Kolne beat, Helwak Range.



Huge Tiger and other wildlife painting inaugurated on the occasion of International Tiger Day at Nature Information Centre of Range Forest Office, Amba



Inauguration of large Ecotourism Board by CF & FD, STR, and DD, Koyna at Karvat Kusawde Ecotourism Zone, Patan Range.



Large Ecotourism Board at Koyna-Helwak Ecotourism Center, Rasati



Inauguration of new Khuduplewadi Protection Camp with CF & FD, STR, and DD, STR, Patan Range, Koyna Division.



Pagoda constructed on the Safari route of Bhairawgad, Helwak Range.



Newly constructed Eco-tourism Entrance Gate at Udgiri check Post, Amba Range, Chandoli Division.



Un-Man protection barrier gate, Male beat, Helwak Range.



New Solar Pannel and watering system at Chandoli Khurd protection, Helwak Range.

STUDY TOURS & WORKSHOPS



Inter-state Meeting at Dandeli, Kali Tiger Reserve
Karnataka, Maharashtra & Goa.



Inter-state Meeting at Dandeli, Kali Tiger Reserve
Karnataka, Maharashtra & Goa.



Study tour for Tiger Recovery Project at
NNTR-Pench, Nagpur landscape.



Visit to WRTC, Gorewada, Nagpur for
Tiger Recovery Project.



Visit to Rayat Science and Innovation Activity
Center, Satara.



Visit to Rayat Science and Innovation Activity
Center, Satara



Rehabilitation tour with villagers at Dhanewadi



Visit to Amboli Range Forest Office from STR-KTR Corridor

PLANTATION



Plantation at Koyna Ecotourism Campus on the occasion of World Environment Day- 5th June 2024.



Plantation at Deputy Director, Koyna Office, Karad on the occasion of World Environment Day- 5th June 2024.



Plantation at Range Forest Office, Dhebewadi on the occasion of World Environment Day- 5th June 2024.



Plantation at Koyna Ecotourism Campus on the occasion of World Environment Day- 5th June 2024.



Plantation at Patan Ecotourism Zone on the occasion of World Environment Day- 5th June 2024.



Plantation at Amba Ecotourism Campus on the occasion of World Environment Day- 5th June 2024.




Grass seed dispersal in Medows





Plantation of ficus tree species stumps

SCIENTIFIC REPORTS AND PUBLICATIONS OF STR











REPORT

FIRST BREEDING RECORD OF ASIAN SMALL-CLAWED OTTER *Aonyx cinereus* (ILLIGER, 1815) FROM SAHYADRI TIGER RESERVE, WESTERN GHATS, INDIA

Shantanu SHARMA[1], Uttam SAWANT[2], Shah Nawaz JELIL[1], Akash PATIL[1], Abhilasha SRIVASTAVA[1], Ramesh KRISHNAMURTHY[1]*

[1]*Wildlife Institute of India, Chandrabani, Dehradun, 248001, Uttarakhand, India*
[2]*Sahyadri Tiger Reserve, Van Vardhan building, Tarabai Chowk, Kolhapur, 416003, Maharashtra, India*
**Corresponding Author: ramesh@wii.gov.in*

(Received 29th April 2023, accepted 21st August 2023)


ABSTRACT: Sahyadri Tiger Reserve is a very understudied complex of the Western Ghats landscape of India. The presence of diverse and heterogenous habitats supports a diverse species assembly. Here, we report on the occurrence and breeding of Asian Smallclawed Otters in the tiger reserve through opportunistic camera trapping conducted from November 2021–March 2022 at sampled locations along streams. Asian Small-clawed Otters were recorded from five locations with a photographic capture rate of 0.94 (± 0.57 SE) and in group sizes of 1–5 individuals, including pups. However, extensive surveys are necessary to generate reliable abundance estimates and to clearly understand otter distribution patterns in this landscape.

CITATION: Sharma, S., Sawant, U., Jelil, S.N., Patil, A., Srivastava, A., and Krishnamurthy, R. (2024). First Breeding Record of Asian Small-Clawed Otter *Aonyx cinereus* (Illiger, 1815) from Sahyadri Tiger Reserve, Western Ghats, India. *IUCN Otter Spec. Group Bull.*, **41** (1): 15 - 23
KEYWORDS: Camera traps, Northern Western Ghats, Mustelidae, Carnivore, Sahyadri Tiger Reserve


INTRODUCTION

India is the westernmost range of the Asian Small-clawed Otter worldwide (Wright et al., 2021). This species is distributed across northeast India, the Himalayan foothills, Eastern Ghats, and Western Ghats (Hussain, 1999; Sharma et al., 2014). The









Activity by SWRF, STR

FELLOWSHIP AND INTERNSHIP PROGRAMME



Ms. Deepanjali Jambhale

Msc. Forestry, College of Forestry, Dapoli

Research Fellow, SWRF, STR

Thesis Topic: "Grasslands of STR, their status and usage by wild animals"



Ms. Urvija Dhoke

Msc. Forestry, College of Forestry, Dapoli

Research Fellow, SWRF, STR

Thesis Topic: "Impact of Exotic plantations on biodiversity in STR"



Ms. Susmita Patil

Msc. Zoology, Shivaji University, Kolhapur

Research Intern, SWRF, STR

Assignment: "Phase-IV Camera Trap data analysis"



Mr. Aditya Lad

Msc. Bioinformatics, Bharti Vidyapeeth, Pune

Research Intern, SWRF, STR

Assignment: "To analyse hair samples from collected scats of Tiger and Co-predators for the identification of their probable prey species in "Sahyadri Tiger Reserve."



Mr. Saksham Shree

Msc. Biodiversity & Conservation, Guru Gobind Singh Indraprastha University, New Delhi

Research Intern, SWRF, STR

Assignment: "To analyse hair samples from collected scats of Tiger and Co-predators for the identification of their probable prey species in Sahyadri Tiger Reserve."



Mr. Vishal Pawar

Msc. Geoinformatics, Shivaji University, Kolhapur

Research Intern, SWRF, STR

Assignment: "Analysis of MSTrIPES Patrolling data and Phase-IV Camera Trap data."



Mr. Sushant Gurav

Msc. Geoinformatics, Shivaji University, Kolhapur

Research Intern, SWRF, STR

Assignment: "Analysis of MSTrIPES Patrolling data and Phase-IV Camera Trap data."

BIODIVERSITY OF SAHYADRI TIGER RESERVE



निळ्या पंखाचा पोपट
Malabar Parakeet
(Psittacula columboides)
© Sachin Dhaigude,
Education Extension Office



पट्ट मयुर
Common Banded Peacock
(Papilio crino)
© Vilas Nangare-Patil,
Chandoli Range



ऍटलास पतंग
Atlas Moth
(Attacus atlas)
© Shivaji Patil,
Forester, Chandoli Range



कवड्या साप
Travancore Wolf Snake
(Lycodon travancoricus)
© Sumit Chalke,
Kondawale



महाधनेश
Great Indian Hornbill
(Buceros bicornis)
© Arvind Patil,
Forest Guard, Amba Range



रंगीत गळ्याचा सरडा
Fan-throated Lizard
(Sarada superba)
© Vinayak Kadam,
Koyna Range



कोल्हा
Golden Jackal
(Canis aureus)
© Nandakumar Nalawade,
RFO, Chandoli Range



आळंबी जात
Ground Mushroom
(Tylopilus sp.)
© Shishupal Pawar,
RFO, Patan Range



शिंजरा तीसा / व्याध
White-eyed buzzard
(Butastur teesa)
© Swapnil Shendge,
Forest Guard, Bamnoli Range

वनरक्षक

आता मी वनरक्षक, केले आधी सीमेचे संरक्षण
आता करतोय सह्याद्रीचे रक्षण
आधी होते दुश्मन अतिरेकी, घुसखोरी, प्रतिकुल हवामान
आता शिकारी, वृक्षतोड, वन वणवा समान

दोहो मध्ये एकच साम्य
आपल्या मातृभूमी चे रक्षण
आता भागवितो, वन्यप्राण्यांची तहान
आणि उगवितो हरणांसाठी कुरण

वाचवितो जंगल प्लास्टिक पासून
आणि उपद्रवी मानवी हस्तक्षेपांपासुन
राखितो वाघांचा अधिवास
लाऊनी जीवाच सायास

पुढच्या पिढी साठी निदान
जपुया हा अद्भूत ठेवा विलक्षण
वन्यजीव इथला सुरक्षित रहावा
पर्यावरण रक्षणाचा वसा आपुनि घ्यावा

चला करुया हा वारसा जतन
नाही होऊ देऊ सह्य-कडयांचे पतन
घेऊनी भारत मातेची आन
सह्याद्री आहेच जगाची शान

असा मी वनरक्षक, असा मी वनरक्षक
या सृष्टीमातेचा संरक्षक!



कैलास रामचरण पांडे
वनरक्षक,
सावरट, वनपरिक्षेत्र पाटण

माझा सह्याद्री

काय सांगू मला सह्याद्री सुटेना
त्याच्या विना मला काही सुचेना,
त्याची थंड झुळूक, माझ्या काळजात घुसली
जसी हिरवळीची माया, माझ्यावर पसरली.

त्याच्या दऱ्या खोऱ्यातून वाहता, झुळझुळ झरा
झरा कसला हा तर आहे, सृष्टीचा रम्य सोहळा,
घनदाट वृक्षवल्ली, त्याची जसी माझी माय
वन्यप्राणी, कीटक, पक्षी सर्वाना, सांभाळीत जाय.

त्याच्या लाडक्या वाघोबाने, मारताच डरकाळी
आठवण होते मला माझ्या, बापाची आरोळी,
त्याला पाहूनी वाटे, उगाच झालो मनुष्य
त्याच जीव म्हणूनी, जगलो असतो आयुष्य.

समाज कंटक हैवान, करतो लेकराचे भक्षण
म्हणूनी करतो रात्र दिवस सदैव त्यांचे रक्षण,
शरीरावरती धाव घालूनी करती जखमा तयास
तरीही माझा सह्याद्री करी, ताठ राहण्याचा प्रयास.

असाच आहे सह्याद्री माझा, भागवी सर्व जीवाची तहान
महाराष्ट्रातच नाही जगात आहे, तयाची किर्ती महान,
जागतिक वारसा सह्याद्रीचा, आम्हांस त्याचा अभिमान
म्हणुनी गर्वाने आहे, ही तर महाराष्ट्राची शान.



नितीन बोडख
वनरक्षक,
शिरशिंगे, वनपरिक्षेत्र कोयना

THE OFFICE OF CONSERVATOR OF FORESTS & FIELD DIRECTOR,
SAHYADRI TIGER RESERVE, KOLHAPUR
Vanvardhan, Opp. Post Head Office, Tarabai Park,Kolhapur -416003, Maharashstra, India
Ph. : 0231-2653632 Fx. : 0231-2659233, Email : ccfwlkopstr@mahaforest.gov.in